रविवार, ६ नोव्हेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक १०९
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

भारत जोडो यात्रेचा काँग्रेसला फायदा नाही -बावनकुळे/२

खोपोलीत कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार; ३४ जणांना अटक/७

आशियाई स्क्वॉश स्पर्धेत भारताला प्रथमच सुवर्ण/८

## आजपासून भाजपचे जागर मुंबईचा अभियान

**मुंबई** : महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून मुंबईत जागर मुंबईचा हे अभियान रविवारपासून (दि. ६) सुरू करण्यात येणार आहे. वांद्रे येथून याची सुरुवात होईल. मुंबईतील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक याप्रमाणे ३६ सभा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या अभियानाबाबत बोलताना भाजपचे मुंबई अध्यक्ष ॲड. आशिष शेलार म्हणाले, पालिकेतील भ्रष्टाचार, परिवारवाद यांच्याविरोधात भाजपचा जागर सुरू होत आहे. याची सुरुवात वांद्रे येथून होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या अभियानाची घोषणा करण्यात आली. या जागर यात्रेचे प्रमुख आमदार अतुल भातखळकर असणार आहेत. हे अभियान भ्रष्टाचाराची पोलखोल केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास भातखळकर यांनी व्यक्त केला.

# केवळ आश्वासन देणार नाही तर १०० टक्के अंमलबजावणी

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची येणाऱ्या उद्योगांबाबत ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील औद्योगिक प्रकल्पांविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा झाली असून यापुढे महाराष्ट्रात मोठमोठे प्रकल्प मंजूर करण्यात येणार आहेत. चिंता करू नका, असे आश्वासन त्यांनी दिले आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग आणून महाराष्ट्राला विकासात सर्वोच्चस्थानी नेणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नुसते करार करणार नाही. आगामी काळात करारांची १०० टक्के अंमलबजावणी होईल आणि विदेशी गुंतवणूकही वाढेल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

हे सरकार लोकाभिमुख, विकासाभिमुख असेल. गेल्या तीन महिन्यांत जनतेच्या हिताचे चांगले निर्णय घेतले. पेट्रोल, डिझेलचे भाव कमी करून जनतेला दिलासा दिला. नैसर्गिक आपत्तीत नुकसानग्रस्तांना केंद्राच्या निकषांपेक्षा जास्त मदत केली आहे. देशात सर्वांत जास्त पायाभूत सुविधांचे काम महाराष्ट्रात सुरू आहे. सरकार विकासकामांच्या माध्यमातून जनतेची सेवा करीत आहे. हे जनतेचे सरकार आहे. कोरोनामुळे आर्थिक अडचणीत आलेली राज्याची अर्थव्यवस्था सुधारत असल्याचे शिंदे यांनी या वेळी सांगितले. राज्यातून काही प्रकल्प गुजरातला जात असल्याबद्दल सरकारवर होत असलेले आरोप खोडत, राज्यात नव्या प्रकल्पांविषयी मोदी यांच्याशी चर्चा झाली असून यापुढे महाराष्ट्रात मोठमोठे प्रकल्प देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. येत्या काळात राज्यात होणाऱ्या सर्व औद्योगिक सामंजस्य करारांची १०० टक्के अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग लवकरच सुरू होईल. महामार्गालगत नवनगर, नोड्स, 'नॉलेज सिटी' उभारण्यात येत आहेत. या ठिकाणी रोजगारनिर्मिती होणार आहे. (पान २ वर...)



### दोन वर्षांत मुंबई खड्डेमुक्त करणार

मुंबईत दर्जेदार रस्त्यांची निर्मिती करण्याचे काम केले जात आहे. निविदा प्रकियेला सुरुवात झाली आहे. सुमारे पाच हजार ५०० कोटी रुपयांचे काँक्रीट रस्ते दोन वर्षांत पूर्ण होतील. येत्या काळात मुंबईचा चेहरामोहरा बदललेला दिसेल, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.




(छाया : योगेश पाटील)

# परिसर एकरूप करण्याचे काम महोत्सव करतात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिसर एकरूप करण्याचे काम हा महोत्सव करीत आहे, असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आगरी-कराडी महोत्सवाच्या उद्घाटनावेळी शुक्रवारी (दि. ४) केले.

### कामोठ्याचा महोत्सव २०२२चे उद्घाटन

कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय झेंडा सामाजिक संस्था कामोठे यांच्या वतीने आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव २०२२चे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, रोहिदास ठाकूर, समाजसेवक राजेश म्हात्रे, भाऊ भगत, कामोठे सरचिटणीस शरद जगताप, भटके विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या तामखेडे, कामोठे शहर महिला मोर्चा अध्यक्षा वनिता पाटील, विनोद भगत, संतोष गायकर, नारायण सोनावणे, संस्थापक अशोक राघो पावणेकर, ॲड. जय पावणेकर यांच्यासह कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय झेंडा सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यंदाचे हे या महोत्सवाचे ११वे वर्ष असून हा महोत्सव ४ ते १३ नोव्हेंबर या दरम्यान कामोठे सेक्टर ११ येथील सोनारी मैदानात सुरू आहे. या महोत्सवात सोलो डान्स स्पर्धा, गुलजार गुलछडी लावणी, कामोठे आयडॉल, हभप. चंद्रकांत महाराज खळेकर यांचे कीर्तन, मिस कामोठे, ग्रुप डान्स स्पर्धा, कामोठे महोत्सव श्री, दर्यासागराचा राजा, गौरव महाराष्ट्राचा यांसह अनेक बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा आस्वाद कामोठेकरांना घेता येणार आहे.



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा



नवसारी (गुजरात) : गुजरात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत निवडणुकीच्या नियोजनाविषयी मंत्री शिवप्रकाश यांनी उपस्थितांना संबोधित केले. या वेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष तथा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, जिल्हा चिटणीस रमेश मुंडे, विपूल चौटालिया यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुंबईत फॅशन स्ट्रीट भागात भीषण आग

**मुंबई** : चर्चगेटजवळील फॅशन स्ट्रीटवरच्या दुकानांना शनिवारी (दि. ५) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या सहा गाड्या, स्थानिक पोलीस घटनास्थळी पोहचले. या घटनेत काही दुकानामधील साहित्य जळून खाक झाले आहे. काही कालावधीतच आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन विभागाच्या जवानांना यश आले. आग कशाने लागली, याचा शोध सुरू आहे, अशी माहिती अग्निशमन विभागाने दिली.

## निवडक

### पोहायला गेलेल्या दोघांचा मृत्यू

**पालघर** : आवंडे येथील वैतरणा नदीत पोहण्यासाठी आलेल्या दोन तरुणांचा शुक्रवारी (दि. ४) बुडून मृत्यू झाला. सुनील डिके (वय ३०) आणि कार्तिक कोदे (वय १७) अशी दोघांची नावे आहेत. वाडा तालुक्यातील आवंडे येथे वैतरणा नदीत पोहण्यासाठी हे तरुण आले होते, मात्र पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने दोघेही बुडाले. स्थानिकांनी सुनीलला बाहेर काढले, मात्र रुग्णालयात त्याचा मृत्यू झाला. दुसऱ्या दिवशी पहाटेच्या कार्तिकचा मृतदेह शोधण्यात पोलिसांना यश आले.

### आज भारत-झिम्बाब्वे भिडणार

**मुंबई** : टी-२० विश्वचषकामधील पहिल्या गटातील चित्र स्पष्ट झाले आहे. पहिल्या गटामधून न्यूझीलंड आणि इंग्लंडने उपांत्यफेरी गाठली आहे. भारताचा सामावेश असणाऱ्या दुसऱ्या गटातील चित्र रविवारी (दि. ६) स्पष्ट होणार आहे. रविवारी भारत विरुद्ध झिम्बाब्वे असा सामना दुपारी १.३० वाजता रंगणार आहे. हा सामना जिंकला तर भारत थेट उपांत्य फेरीत दाखल होणार आहे.

# नवाब मलिकांना धक्का; ईडी मालमत्ता करणार जप्त



**मुंबई : प्रतिनिधी**

आर्थिक गैरव्यवहार प्रकरणामुळे ईडीच्या ताब्यात असलेले राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांच्याविरोधात ईडीने आता कडक पाऊल उचलले आहे. नवाब मलिक यांची मालमत्ता जप्त करण्यासाठी ईडी प्राधिकरणाने परवानगी दिली आहे.

मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात फेब्रुवारी महिन्यात नवाब मलिक यांना ईडीने अटक केली. त्यानंतर एप्रिलमध्ये ईडीने मलिक कुटुंबाची मालमत्ता तात्पुरती जप्त केली होती. अधिनिर्णय प्राधिकरणाने संलग्नकाची पुष्टी केली आहे. या मालमत्ता नवाब मलिक, त्यांचे कुटुंबीय, सॉलिड्स इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मलिक इन्फ्रास्ट्रक्चरशी संबंधित आहेत. नवाब मलिक यांच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे, पण आता ईडी प्राधिकरणाने नवाब मलिकांची मालमत्ता जप्त करण्यास परवानगी दिली आहे.

नवाब मलिक आणि त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेच्या तात्पुरत्या जप्तीची पुष्टी एका न्यायप्रणाली प्राधिकरणाने अलिकडेच केली होती. त्यात गोवाला कंपाउंडचा परिसर आणि कुर्ला पश्चिमेला तीन फ्लॅट्स, वांद्रे पश्चिमेला दोन फ्लॅट्स आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील १४७ एकर शेतजमिनीचा समावेश आहे. मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत ईडीचे अधिकारी त्यांच्या कायदेशीर टीमशी चर्चा करीत आहेत.

# पथविक्रेत्यांना जागा देण्याचे धोरण असताना त्यांच्यावरील कारवाई अयोग्य

## माजी उपमहापौर सीताताई पाटील यांचा पालिका प्रशासनावर आक्षेप

**पनवेल : वार्ताहर**

खांदा वसाहतीमध्ये राष्ट्रीय फेरीवाला धोरण राबवले गेलेले नाही. त्याचबरोबर पथविक्रेत्यांना पर्यायी जागासुद्धा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. असे असताना त्यांच्यावर महापालिकेकडून कारवाई करण्यात येत आहे. यावर माजी उपमहापौर सीताताई पाटील यांनी आक्षेप घेतला आहे. अगोदर पुनर्वसन आणि पर्यायी जागा द्या, अशी मागणी त्यांनी केली आहे.

खांदा वसाहतीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून भाजी, फळे, खाद्यपदार्थ, मासळी, हार-फुले त्याचबरोबर पुजेचे साहित्य आणि इतर संसारोपयोगी वस्तू विक्री करून शेकडो जण आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. संबंधित फेरीवाल्यांचे



सर्वेक्षण होऊनसुद्धा अनेक वर्ष उलटले आहे. त्यानंतर महापालिकेची स्थापना झाली, परंतु राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार संबंधितांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही.

सेक्टर ८ येथील भूखंडावर पंतप्रधान आवास योजनेंतर्गत इमारती बांधण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे या भूखंडालगत व्यवसाय करणाऱ्यांवर सिडकोने कारवाई केली.

पदपथाच्या कडेला बसून हे विक्रेते व्यवसाय करीत आहेत, परंतु त्यांच्यावर सातत्याने महापालिका प्रशासनाकडून कारवाईची टांगती तलवार उगारली जात आहे. (पान २ वर...)

### सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा

*प्रशासक आणि प्रशासन प्रमुख म्हणून पथविक्रेत्यांना न्याय द्यावा. त्याचबरोबर जोपर्यंत पर्यायी जागा दिली जात नाही, तोपर्यंत आहे त्याच ठिकाणी त्यांना व्यवसाय करता यावा या अनुषंगाने प्रशासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा ही विनंती सीताताई पाटील यांनी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.*

# अजित पवारांच्या गैरहजेरीने शिबिरात चर्चा

**शिर्डी : प्रतिनिधी**

शिवसेनेला खिंडार पडल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसला धक्का बसणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. आता राष्ट्रवादीचे नेते अजित पवार शिर्डी येथील राष्ट्रवादीच्या मंथन शिबिराला गैरहजर राहिल्याने पुन्हा एकदा अजित पवार नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे मंथन शिबिर सुरू आहे. या शिबिराला शनिवारी (दि. ५) राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवारदेखील हजर होते, मात्र अजित पवार शिबिराच्या दुसऱ्या दिवशी पोहचले नाहीत. त्यामुळे अजित पवार नाराज असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. याआधी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिल्लीतील कार्यक्रमात अजित पवार नाराज होऊन निघून गेले होते, मात्र त्यावेळी आपण नाराज नसल्याचे ते म्हणाले होते.

शरद पवार हजर असलेल्या कार्यक्रमात अजित पवार सहसा जात नाहीत. मेळावा शुक्रवारपासून सुरू झाला आहे, मात्र दुसऱ्या दिवशी अजित पवार हजर न राहिल्याने नाराजीच्या चर्चांना उधाण आले आहे.

# राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेला प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मानाच्या अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला शुक्रवारपासून (दि. ४) पुणे येथील केंद्रातून प्राथमिक फेरीच्या उद्घाटनाने प्रारंभ झाला. रामकृष्ण मोरे सभागृहात झालेल्या या प्राथमिक फेरीचे भाजपचे सांस्कृतिक सेलचे प्रदेशाध्यक्ष शैलेश गोजमगुंडे व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सांस्कृतिक सेलचे प्रदेश सहसंयोजक उमेश धनसाली, दिग्दर्शक, अभिनेते व लेखक दीपक पवार, लेखक व अभिनेते राहुल वैद्य, तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, खजिनदार अमोल खेर, सांस्कृतिक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, चिन्मय समेळ यांच्यासह कलावंत उपस्थित होते.




### नाट्यचळवळ वृद्धींगत करण्याचा प्रयत्न...

*नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी अटल करंडक एकांकीका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला.*

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

नाट्यचळवळ वद्धींगत करण्यासाठी व नाट्य रसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धिंगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण यामुळे ही स्पर्धा रसिकांच्या गळ्यातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभत असतो. (पान २ वर...)

# पक्षफुटीवरून काँग्रेस-शिवसेनेत दावे प्रतिदावे

**औरंगाबाद : प्रतिनिधी**



शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी, काँग्रेसचे २२ आमदार फुटणार आहेत, असा दावा केला होता. यानंतर काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी त्यांना प्रत्युत्तर देत जे सत्तेत राहून आपला पक्ष सांभाळू शकले नाही, त्यांना काँग्रेसबद्दल बोलण्याचा कोणताही अधिकार नाही असे म्हणले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये दावे-प्रतिदाव्यांचा खेळ रंगला आहे.

कोर्टाने निर्णय दिला तर शिंदे गटाचे १६ आमदार बाद ठरले जातील. त्यामुळे आपले मुख्यमंत्रिपद कायम राहावे यासाठी त्यांनी फौज तयार ठेवली आहे. काँग्रेसची रॅली झाल्यानंतर २२ आमदार फुटणार आहेत, असा दावा चंद्रकांत खैरे यांनी केला होता. यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी, जे सत्तेत राहून आपला पक्ष सांभाळू शकले नाही, त्यांना काँग्रेसबद्दल बोलण्याचा अधिकार नाही. पहिले आपले घर पाहायचे आणि मग दुसऱ्यांच्या घरावर रेघोट्या मारायच्या. स्वत: घर सांभाळू शकले नाही, त्यांनी यावर बोलू नये, असा टोला नाना पटोले यांनी लगावला.

# भारत जोडो यात्रेचा काँग्रेसला फायदा नाही

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची स्पष्टोक्ती



**ठाणे : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमुळे त्यांच्या पक्षात चैतन्य निर्माण होऊन इतर पक्षांतील कार्यकर्ते काँग्रेसमध्ये जाण्याऐवजी काँग्रेसमधून भाजपमध्ये कार्यकर्ते प्रवेश करीत आहेत. राहुल गांधी यांची यात्रा त्या पक्षातील नेत्यांनी 'हायजॅक' केली असून त्यांच्या पक्षाला यात्रेचा काही फायदा होणार नाही, उलट नुकसानच होईल, असे मत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी (दि. ५) व्यक्त केले.

ठाणे जिल्ह्याच्या संघटनात्मक प्रवासादरम्यान ते ठाणे येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी भाजप प्रदेश सरचिटणीस अ‍ॅड. माधवी नाईक व भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष आमदार निरंजन डावखरे उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेवर त्या पक्षातील नेत्यांचा कब्जा आहे. ते कार्यकर्त्यांना राहुल गांधी यांना भेटू देत नाहीत. परिणामी या यात्रेमुळे त्यांचा पक्ष वाढण्याऐवजी कमकुवत होत आहे. अन्य पक्षातील नेते, कार्यकर्ते काँग्रेसमध्ये प्रवेश करीत नाहीत, उलट काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. नंदूरबारच्या काँग्रेसच्या तीन नगरसेवकांनी आजच भाजपमध्ये प्रवेश केला. २०२४ची आगामी निवडणूक येईपर्यंत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक नेते भाजपमध्ये प्रवेश करतील.

त्यांनी सांगितले की, भाजप आगामी निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील बाळासाहेबांची शिवसेना पक्षासोबत युती करून लढवेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अफाट लोकप्रियता, त्यांच्या सरकारचे काम, राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारचे काम आणि पक्षाच्या संघटनात्मक ताकदीच्या जोरावर आम्ही यश मिळवू. आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यात ४८ पैकी किमान ४५ जागा व विधानसभा निवडणुकीत किमान २०० जागांवर आम्ही यशस्वी होऊ. आमच्या विरोधात तीनही पक्ष एकत्र आले तरी आम्ही विजय मिळवू.

महाविकास आघाडी ही वैचारिक आधारावर नव्हे तर केवळ भाजपला दूर ठेऊन सत्ता मिळविण्यासाठी निर्माण झाली, पण विचार सोडल्यामुळे आता पारंपरिक मतदार दुरावण्याच्या भितीने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे शिवसेनेवर टीका करीत आहेत, असे त्यांनी सांगितले.

### लवकरच 'मविआ'मध्ये बॉम्बस्फोट

**मविआमधील तिन्ही पक्षांमध्ये बॉम्बस्फोट झालेले दिसतील. महाविकास आघाडीला आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांसाठी उमेदवार मिळणे कठीण होईल. नाना पटोले सध्या अस्वस्थ आहेत. सरकार गेल्यामुळे त्यांची ही अवस्था आहे. लाचार, दुराचार, भ्रष्टाचार यासाठी हे तीन लोक एकत्र आले होते. एक दिलके टुकडे हुए हजार, कोई कहा गिरा, कोई कहा गिरा... अशी अवस्था त्यांची झाली आहे. मूळ विचाराचे काँग्रेसचे लोक आपल्याच चुकीमुळे नाराज आहेत. बेईमानी करून सरकार स्थापन केलं. काँग्रेस उद्धवजींसोबत गेल्याने पक्षातील अनेक लोक नाराज आहेत. ते आता भाजपमध्ये प्रवेश करतील. त्यामुळे उद्धव ठाकरे, युतीबद्दल ते टीका करतायत. ते आपापसात ते सर्व रंगलेले आहे, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.**

# ट्रक-ऑटोच्या भीषण अपघातात सात महिला मजूर ठार

## कर्नाटकातील बीदरमधील घटना




**लातूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या शेजारील कर्नाटक राज्यातील बीदर जिल्ह्यातील बेमलखेडा गावाजवळ शुक्रवारी (दि. ४) सायंकाळी ट्रक आणि ऑटोचा समोरासमोर भीषण अपघात झाला. त्यात सात महिला मजूर ठार झाले तर सहा जण जखमी झाले.

बिदर जिल्ह्यातील चिटगुप्पा तालुक्यातील बेमलखेडा गावाजवळ हा अपघात झाला असून मृत सर्व उदमनल्ली गावातील असल्याची माहिती बेमलखेडा पोलीस ठाण्याचे पीएसआय शिवकुमार यांनी दिली. उदमनल्ली गावातील मजूर शेजारील गावातील शेतशिवारात शुक्रवारी कामासाठी गेले होते. हे सर्व मजूर काम आटोपून सायंकाळी ऑटो (एपी २३, डब्ल्यू ९२५०) मधून घराकडे निघाले होते. दरम्यान, बेमलखेडा गावाजवळ समोरुन येणारी ट्रक (टीएस ११, जीडी ०७५२) यांचा समोरासमोर भीषण अपघात झाला. त्यात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. जखमींवर मन्नाखळी येथील रुग्णालयात प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी बिदर येथील ब्रिम्स रुग्णालयात दाखल केले असता सहा महिलांचा मृत्यू झाला.

या अपघातात प्रभावती (३६), पार्वती (४०), गुंडम्मा (५२), मंजुळा (३२), रुक्मिणी (६०), जगदेवी (३८), ईश्वरी (४०, सर्वजण रा. उदमनल्ली, ता. चिटगुप्पा, जि. बीदर) हे ठार झाले आहेत. अपघातातील जखमी सहा जणांवर बिदर आणि मन्नाखेली रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी बेमलखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पीएसआय शिवकुमार हे करीत आहेत. दरम्यान, कर्नाटकचे मुख्यमंत्री बी. एस. बोम्मई यांनी दु:ख व्यक्त केले.

# सोशल मीडियावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची बदनामी

## डोंबिवलीतील तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी फेसबुकवर बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध केल्याप्रकरणी डोंबिवली पश्चिमेतील उमेशनगरमधील एका तरुणावर विष्णूनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शशांक माणगावकर (३९) असे आरोपीचे नाव आहे.

शशांकने मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांबद्दल सोशल मीडियावर बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करून शिवसैनिकांच्या भावना दुखविण्याचा प्रयत्न केला, तसेच राजकीय गटात द्वेशभावना निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे डोंबिवलीतील पदाधिकारी संतोष चव्हाण यांनी तक्रार केली आहे.

पोलिसांनी सांगितले, आरोपी शशांक माणगावकर यांनी शुक्रवारी त्यांच्या फेसबुक पानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेतात काम करीत असतानाच्या छायाचित्रावर मुख्यमंत्री शिंदे यांची बदनामी होईल, अशा पद्धतीने मजकूर प्रसिद्ध केला होता. या छायाचित्र आणि त्याखालील ओळीने राजकीय द्वेशभावनेचे वातावरण निर्माण करण्यात आले होते, तसेच शशांकने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विषयी शेरेबाजी करुन त्यांचीही बदनामी केली आहे. संतोष चव्हाण यांच्या हा प्रकार निदर्शनास येताच त्यांनी विष्णूनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ भालेराव यांना घडला प्रकार सांगितला.

पोलिसांनी शशांकची फेसबुक पानावरील लिखाणाची खात्री करुन त्याच्या विरुद्ध राजकीय द्वेशभावना पसरविणे, दोन गटात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# सरन्यायाधीश उदय लळीत यांचा राजभवनात सत्कार

**मुंबई : प्रतिनिधी**




महाराष्ट्राचे सुपुत्र उदय उमेश लळीत यांनी ऑगस्ट महिन्यात सरन्यायाधीशपदाचा पदभार स्वीकारला. त्यानंतर ७४ दिवसांच्या कार्यकाळानंतर ८ नोव्हेंबर रोजी ते निवृत्त होणार आहेत. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते शनिवारी (दि. ५) राजभवनात सत्कार करण्यात आला.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, लळीत सर नेहमी लिफ्टचा वापर न करता पायी चालत जात होते. त्यामुळे ते २२ वर्षांपूर्वी जसे दिसायचे तसेच आताही त्यांचा फिटनेस आहे, असा किस्सा सांगत लळीत यांचा अभिमान असल्याचे प्रतिपादन केले.

सरन्यायाधीशांशी ओळख आहे असे म्हटले की, लोक टीका करतात, मात्र मी सरन्यायाधीश लळीत यांना २००० सालापासून ओळखतो. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात महानगरपालिकेचा एक खटला होता. तेव्हा सरन्यायाधीश उदय लळीत हे आमचे वकील होते. सर्वोच्च न्यायालयाजवळ असलेल्या सरांच्या फ्लॅटवर आम्ही बसायचो. त्यांच्या फ्लॅटवर जाताना आम्ही लिफ्टचा वापर करायचो, ते मात्र पायऱ्यांनी वर जायचे. त्यांची प्रकृती उत्तम असण्यामागे हेच कारण असावे, असे फडणवीस म्हणाले.

दिल्लीमध्ये जाऊन सर्वोच्च न्यायालयात त्यांनी उत्तम वकिली केली. त्या काळात सुप्रिम कोर्टातील अभ्यासू आणि ज्ञानी वकील म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये त्यांनी न्यायदानाचे काम केले. ते फार नम्र आहेत. त्यांनी वकील म्हणून उत्तम काम केले, तसेच सरन्यायाधीशपदी विराजमान झाले, तरी त्यांच्यातील नम्रता अद्याप कायम आहे, असे गौरवोद्गार फडणवीस यांनी काढले.

# विविध उपक्रमांनी दक्षता आठवडा साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**



दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त एसीबी नवी मुंबई विभागाकडून नवी मुंबई, पनवेल परिसरात विविध कार्यक्रम राबवण्यात येत आहेत, तसेच या कार्यक्रमांत भ्रष्टाचार थांबवण्यासाठी आवाहन नागरिकांना करण्यात येत आहे.

या वेळी भ्रष्टाचाराचे विरुद्ध जनजागृती करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सीवूड्स येथील नेक्सस मॉलमध्ये पथनाट्य सादर केले. उपस्थित लोकांना भ्रष्टाचार बाबत काही तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क करण्यासाठी आवाहन केले आहे. मॉलमधील लोकांना एसीबीचे माहिती पत्रके वाटण्यात आली. भ्रष्टाचार निर्मूलनाचे अनुषंगाने तळोजा एमआयडीसी असोसिएशनचे पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करून उपस्थित पदाधिकारी यांना भ्रष्टाचाराविरुद्ध जनजागृती होण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी शंकांचे निरसन केले.

पनवेल औद्योगिक प्रशिक्षण विद्यालय येथील विद्यार्थी व शिक्षकांचे चर्चासत्र आयोजित केले. या वेळी उपस्थित शिक्षक व विद्यार्थी यांना भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती होणे करीता मार्गदर्शन करून त्यांचे शंकाचे निरसन करण्यात आले. पनवेल सत्र न्यायालय, तसेच सीबीडी बेलापूर येथील न्यायालयाचे दर्शनीय ठिकाणी भित्तीपत्रके लावून न्यायालयात आलेल्या लोकांना माहितीपत्रके वाटण्यात आली.

# नेरूळमधील अनधिकृत स्टॉल, वाहनांवर कारवाई करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर १ सिडको वसाहतीच्या जवळ अनधिकृत स्टॉल आणि उभ्या असलेल्या अनधिकृत वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

नेरूळ सेक्टर १ बँक ऑफ बडोदाच्या बाजूला असलेली अनधिकृत पद्धतीने पानटपरी, वाहने दुरूस्त करण्याची दुकाने सुरू आहेत. त्यामुळे रस्त्याने वाहने चालविण्यासाठी नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागते, तसेच फुटपाथवर अनधिकृत सामान ठेवले असल्याने नागरिकांना ये-जा करणे मुश्कील होते. इथे मोटार दुरूस्त करणे सतत सुरू असते, त्यामुळे वाहनांच्या इंजिनच्या होणाऱ्या आवाजामुळे एन, एल टाईप वसाहत परिसरातील नागरिकांना त्यांचा त्रास जाणवत असतो. या अनधिकृत सुरू असलेल्या व्यवसायामुळे होणाऱ्या त्रासातून मुक्त करण्यासाठी प्रशासनाने त्वरित पाहणी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून वारंवार होत आहे.

याबाबत नेरूळ वार्ड अधिकारी सुनील पाटील यांना विचारले असता, या ठिकाणी नवी मुंबई मनपा कारवाई करीत असते. पुन्हा पाहणी करून पुढील कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# रायगड पोलीस दलातर्फे पोलीस भरती मार्गदर्शन शिबिर





**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा पोलीस दलांतर्गत कर्जत, खालापूर, पेण, अलिबाग, रोहा, माणगाव, श्रीवर्धन, महाड येथे युवक-युवतींकरीता पोलीस भरती मार्गदर्शन शिबिर शनिवारी (दि. ५) झाले.

पोलीस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे व अपर पोलीस अधीक्षक रायगड अतुल झेंडे यांनी पोलीस मुख्यालय अलिबाग येथील शिबिराचे उद्घाटन केले व सर्व युवक-युवतींना मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये जवळपास २००० ते २५०० युवक-युवतींनी सहभाग नोंदविला. शिबिरादरम्यान नामांकित प्रशिक्षकांना मैदानी चाचणीबाबत मार्गदर्शन करण्याकरीता पाचारण करण्यात आले होते, तसेच लेखी चाचणीबाबत मार्गदर्शन करण्याकरीता उत्कृष्ठ दर्जाच्या प्राध्यापकांची निवड करण्यात आली होती.

उपस्थित युवक-युवतींना पोलीस भरती संदर्भातील सेवाप्रवेश नियमामध्ये शासनाने दिलेल्या निर्देशांचे जिल्ह्यातील पोलीस अधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात आले.

पान १ वरून

## केवळ आश्वासन देणार नाही तर १०० टक्के अंमलबजावणी

प्रक्रिया उद्योगही सुरू होईल. शिर्डीपर्यंतचा मार्ग खुला केला जाणार आहे. पुढच्या वर्षात समृद्धी महामार्ग पूर्णपणे सुरू केला जाईल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळे ठाणे, रायगड, संभाजीनगर येथे उद्योग येत आहेत. आता महामार्गाजवळसुद्धा उद्योग वाढत आहेत. या महामार्गामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आणि सर्वच क्षेत्रांत समृद्धी येणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## पथविक्रेत्यांना जागा देण्याचे धोरण असताना त्यांच्यावरील कारवाई अयोग्य

नियमानुसार संबंधितांचे पुनर्वसन व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून सिताताई पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

सिडकोने इतर वसाहतींमध्ये हॉकर्स प्लाझा आरक्षित जागेवर बांधले आहेत. त्याचबरोबर रोज बाजारासाठी जागासुद्धा देण्यात आलेल्या आहेत, मात्र खांदा वसाहतीला प्राधिकरणाने सापत्न वागणूक दिलेली आहे. त्याचबरोबर पनवेल महापालिकेकडून या पथविक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. वास्तविक पाहता पथविक्रेत्यांना अद्यापही पर्यायी जागा महापालिकेकडून देण्यात आली नाही. त्यांचे राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार पुनर्वसन करण्यात आले नाही, असे असताना संबंधितांवर कारवाई करणे हे अन्यायकारक असल्याचे मत सीताताई पाटील यांनी व्यक्त केले आहे.

या संदर्भात माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महासभेमध्ये उपसूचनासुद्धा मांडली होती. त्यानुसार खांदा वसाहतीतील पथविक्रेत्यांना पर्यायी भूखंड देणे क्रमप्राप्त आहे, परंतु तसे न करता फक्त कारवाईचा बडगा उगारणे अत्यंत चुकीचे असल्याचे सीताताई पाटील म्हणाल्या.

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेला प्रारंभ

त्यामुळे ही स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला शुक्रवारपासून विभागनिहाय प्रारंभ झाला आहे. त्यानुसार पुणे केंद्रावर ४ व ५ नोव्हेंबर, सातारा केंद्र ६ नोव्हेंबर, रत्नागिरी ८ नोव्हेंबर, जळगाव केंद्र १२ नोव्हेंबर, नाशिक १३ नोव्हेंबर, रायगड (पनवेल) १९ व २० नोव्हेंबर, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली केंद्रांची प्राथमिक फेरी २४ ते २७ नोव्हेंबर रोजी होणार आहे, तर अंतिम फेरी २ ते ४ डिसेंबर रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे. अंतिम फेरीतील विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांकास ५० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक २५ हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक १० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ एकूण दोन बक्षिसे प्रत्येकी पाच हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप असून सर्वोत्कृष्ट अभिनेता (वैयक्तिक), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (वैयक्तिक), सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (वैयक्तिक), सर्वोत्कृष्ट लेखक (वैयक्तिक), सर्वोत्कृष्ट संगीत (वैयक्तिक), सर्वोत्कृष्ट नेपथ्य (वैयक्तिक), सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना (वैयक्तिक), तसेच रायगड जिल्हा प्राथमिक फेरीतील प्रथम क्रमांक १० हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे, द्वितीय क्रमांक सहा हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे, तृतीय क्रमांक चार हजार रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह त्याचबरोबर अंतिम फेरीकरिता सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका, महाराष्ट्रातील अस्सल मायबोली एकांकिका, लोककलेवर आधारित एकांकिका, सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार व बालकलाकार यांनाही विशेष पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

# महावितरण कोकण प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेत मुख्य कार्यालयास विजेतेपद

**मुंबई : प्रतिनिधी**




महावितरणच्या वतीने आयोजित केलेल्या कोकण प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धेत मुख्य कार्यालय, मुंबईच्या वतीने सादर करण्यात आलेल्या सलवा जुडूम हे नाटक विजेते ठरले.

वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात आयोजित नाट्य स्पर्धेत महावितरण कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक, चंद्रकांत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली व महावितरणचे संचालक (संचलन) संजय ताकसांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्या संघाला आणि नाट्यकलावंतांना बक्षिसे देण्यात आली. जळगाव परिमंडलाने सादर केलेल्या आर्यमा उवाच या नाटकास द्वितीय क्रमांक देण्यात आला.

रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात विरंगुळा म्हणून महावितरण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनोरंजनासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. याचा आनंद घेत सर्वांमध्ये एक नौऊर्जा निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष व महावितरण कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांनी केले. व्यासपीठावर मुख्य अभियंता, धनंजय औंढेकर, कैलास हुमणे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, संजय ढोके, मुख्य सहजनसंपर्क अधिकारी, अनिल कांबळे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन), राजेंद्र पांडे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, रामगोपाल अहिर, नाट्य स्पर्धेचे परीक्षक रविंद्र सावंत, ज्योती मिसाळ, गजानन कराळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता धनंजय औंढेकर, संचालन अनिता चौधरी, शरद मोकल, संगीता चव्हाण, शर्वरी पाटील यांनी केले तर आभार अधीक्षक अभियंता राजाराम माने यांनी मानले.

# यंदा जत्रा, फेस्टिव्हलचा 'अतिउत्साह'

आपल्या ग्रामीण भागात यात्रा, पालख्यांना खूप महत्त्व असते. या जत्रेत लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्व स्तरातील, सर्व जाती-धर्मातील समुदाय मोठ्या आनंदाने व उत्साहाने सहभागी होताना दिसतात. बदलत्या काळात काही गोष्टी बदलल्या असल्या, तरी जत्रेचे आकर्षण बदललेले नाही. कोरोना काळ मात्र याला अपवाद ठरला. यात्रा, पालख्या आणि शहरातील फेस्टिव्हल यांवर बंदी आली. पुन्हा कधी ते अनुभवता येईन की नाही. हा विचार कोरोना काळात बऱ्याच जणांच्या मनात आला, पण आपण सर्वांनी पूर्ण हिमतीने या कोरोना या महामारीवर मात करून एका बोनस आयुष्याचे साक्षीदार झालो. आपले पूर्वीचे निबंधमुक्त आयुष्य जगण्याची संधी आपल्याला मिळाली. म्हणूनच यंदा दोन वर्षांनी यात्रा पालख्या फेस्टिव्हल, महोत्सव उत्साही वातावरणात अनुभवता येतील.



ग्रामीण भागातील जत्रेसह शहरी भागात होणाऱ्या फेस्टिव्हल व महोत्सवातून सामाजिक एकोपा जपला जातो. आजच्या काळातही जत्रेविषयीची आपुलकी कायम राहिली आहे. हल्ली प्रत्येक शहरामध्ये त्या त्या नावे महोत्सव किंवा फेस्टिव्हल आयोजित केला जातो. यामध्ये खासकरून बचत गटांमधील महिलांना स्टॉल चालविण्यासाठी जागा दिली जाते. तसेच छोटे-मोठे व्यावसायिक, आठवडी बाजारातील विक्रेते, पाळणेवाले, खेळणीवाले, तसेच महिलांच्या साहित्यांची तर मेजवानी असते. थंडी सुरू होतास हे फेस्टिव्हल आयोजित केले जातात. आपण या फेस्टिव्हलला आधुनिक जत्रा असेही म्हणू शकतो. कोरोना काळात या फेस्टिव्हलवरदेखील बंदी होती. यंदा डिसेंबर, जानेवारी महिन्यात शहराशहरांमध्ये फेस्टिव्हलची धूम पाहायला मिळणार आहे.

जत्रेत समाजातील सर्वच समाजस्तर जाती-धर्म-वर्ग बाजूला ठेऊन सर्वजण एकाच पातळीवर येतात. सर्वसाधारण त्या धार्मिक मेळावा, आर्थिक मेळावा व बाजारपेठ-व्यापार केंद्र आणि सांस्कृतिक मेळावा, मनोरंजन व क्रीडा या स्वरूपात जत्रेकडे पाहिले गेले आहे. जत्रेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते त्यामुळे जत्रा आहे आपले परंपरागत असे आर्थिक स्त्रोत आहे. कोरोना काळात निर्बंध आले आणि हा आर्थिक स्त्रोत पूर्णतः बंद झाला. हातावर पोट असणारे व्यक्ती जत्रेमध्ये आपली दुकाने थाटत असतात.



या गावातून त्या गावात आणि आठवडी बाजार यांमधून ते लोक आपले पोट भरत असतात. कोरोनामध्ये सर्वांत जास्त हाल याच लोकांचे झाले, परंतु दोन वर्षांनंतर सर्वच गावच्या जत्रा यात्रा पालख्या आणि शहरातील फेस्टिवल महोत्सव मोठ्या उत्साहात निर्बंध मुक्त होत आहेत त्यामुळे हातावर पोट असणाऱ्या व्यक्तींना म्हणजेच जत्रेतील छोट्या व्यापाऱ्यांना मोठी संधी मिळत आहे. त्यांचा उत्साह जत्रा आयोजकांपेक्षा जास्त आहे. दोन वर्षांच्या या प्रतिकूल परिस्थितीनंतर पहिल्यांदाच आलेल्या निर्बंध मुक्त जत्रा, फेस्टिव्हलमध्ये व्यापारी वर्ग मोठ्या तयारीने सज्ज झाला आहे. त्यामुळे मोठ्या व्यावसायिकांपासून ते छोटे विक्रेते यांना अच्छे दिन येणार आहेत.

गावच्या जत्रांमध्ये नागरिक सहपरिवार तसेच नातेवाइकांना सहभागी करीत असतात. या जत्रानिमित्त कुटुंबातील नातलग एकत्र येत असतात. जत्रेच्या निमित्ताने गावातील लहान मुलांना सर्वाधिक आनंद होत असतो. जत्रेसाठी नवीन कपडे, जत्रेतील खेळणी मिळविण्याचा आनंद लहान मुलांमध्ये असतो. जत्रेत काय काय करायचे, याचे नियोजन मुलांत आधीपासूनच सुरू असते.

यंदा जत्रेचा उत्साह द्विगुणीत आहे. दोन वर्षांनंतर जत्रा असल्याने गावात खेळणे विक्रेते व पाळणेवाले येणार आहेत. मोठ्या प्रमाणावर लोक एकत्र येत असल्याने त्यांना आवश्यक असणाऱ्या विविध सेवा जसे, हॉटेल, मिठाई, लहान मुलांची खेळणी, सौंदर्य प्रसाधने, खाद्य पदार्थ, तर काही ठिकाणी खेळणी, बांगड्या, दागिने, कपडे असे विविध स्टॉल सजायला लागतात. त्यांची रेलचेल असल्याने अशा ठिकाणांमधून अनेकांना रोजगार मिळतो.

प्रत्येक गावामध्ये उरूस, जत्रा भरत असते. तसेच शहरामध्ये महोत्सव, फेस्टिव्हल भरत असतो. गावची जत्राही दोन दिवसांची असते तर शहरातील महोत्सव व फेस्टिव्हल हे साधारण दहा दिवसांसाठी असतात.

जत्रा, महोत्सव, फेस्टिव्हल हे घटक समाजासाठी महत्त्वाच्या आहेत. सांस्कृतिक घटकांसह व सामाजिक इतिहास ज्ञात राहावा यासाठी जत्रा, महोत्सव, फेस्टिव्हलला महत्त्व आहे. काळानुसार जत्रांमध्ये बदल झाले. अर्थव्यवस्थेतील बदलांसोबतच, कालावधी, विक्री तसेच वस्तू आणि सेवा यांच्यातील बदल लगेचच दिसून येतो. जत्रा, महोत्सव, फेस्टिव्हल राजकीय व्यवहारांचे, जाती, जमाती आणि सामाजिक एकोपा जपण्यासाठी मेळाव्यांचे ठिकाण बनत आहे.

जत्रा, महोत्सव, फेस्टिव्हल यांच्यामध्ये मनोरंजन, वस्तू, खाद्यपदार्थ, धार्मिक विधी आणि सांस्कृतिक व्यवहार बदलत आहेत. जत्रा, महोत्सव, फेस्टिव्हल हे एकाच वेळी आनंद उपभोगण्याचे ठिकाण आहे. कोरोनानंतर उपभोगता येणारा हा आनंद, समाजाला आर्थिक सक्षमीकरणासाठी फायदेशीर ठरणार असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही कारण मोठ्या प्रमाणात रोजगार व होणारी आर्थिक उलाढाल ही या वर्षी मोठी असेल.

**-तन्वी अनिकेत पवार, पनवेल**

# युद्धात पर्यावरणाचाही बळी जातो

युद्धाच्या परिणाम स्वरूपात फक्त आर्थिक सामाजिक आणि राजकीय अस्थिरता माजते असं आपण म्हणणार असू तर ते मर्यादित तथ्य आहे. मानवाचं जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या युद्ध आणि संघर्षाचा बळी ठरणारा 'पर्यावरण' हादेखील एक मोठा घटक आहे. शस्त्रास्त्र आणि युद्धाच्या पध्दतींमध्ये होत असलेली आधुनिकतेची चढाओढ पर्यावरणासाठी मात्र विनाशकारी ठरतेय. कुठल्याही राष्ट्राचे अस्तित्व हे तिथे उपलब्ध असणाऱ्या संसाधनांवर अवलंबून असते. या संसाधनांमध्ये सीमा, पाणी, अन्न, ऊर्जा स्त्रोत, कच्चा माल अशा असंख्य गोष्टींचा समावेश होतो. हीच संसाधनं कालांतरानं सशस्त्र संघर्षाची कारणं सुद्धा बनतात.



५ नोव्हेंबर २००१ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेनं 'युद्ध व सशस्त्र संघर्षांमुळे होणारं पर्यावरणाचं शोषण' रोखण्यासाठी ६ नोव्हेंबर हा आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून जाहीर केला. अकारण मृत्युमुखी पडलेले सैनिक आणि निष्पाप नागरिक यांचा विचार करून संपूर्ण मानवजातीनं नेहमीच युद्धांची निंदा केली आहे. पण त्याही पलीकडे जाऊन पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाच्या अस्तित्वाला अर्थ देणाऱ्या पर्यावरणावर सुद्धा युद्धाचे विनाशकारी परिणाम आहेत. जे तात्पुरते नसून पिढणपिढ्या पुरतील इतके वाईट आहेत. या परिणामांची सर्वांना जाण व्हावी आणि विध्वंसक परिणामांना सामोरं जाण्यापासून जगाला वाचवलं जावं यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेनं उचललं हे पाऊल.

संघर्ष चालू असलेल्या परिसरातलं पर्यावरण बहुतेकदा युद्धशैलीला बळी पडतं. अगदी पहिल्या महायुध्दापासून प्रभावी शस्त्र म्हणून दारूगोळ्यासोबत रसायनांचाही अतोनात वापर केला जातो. पहिल्या महायुद्धादरम्यान सुमारे १२५,००० टन रासायनिक पदार्थ वापरण्यात आले, तर व्हिएतनाम युद्धादरम्यान सुमारे ९६,००० टन इतके रासायनिक पदार्थ वापरण्यात आले. या रासायनिक पदार्थांमुळे पाणी आणि माती नकळतपणे विषारी होते. स्फोटांमुळे वातावरणातील उष्णतेत वाढ होते. त्यातून उत्सर्जित होणाऱ्या धुरामध्ये हवेतील हरितगृह वायूंचं प्रमाण वाढून परिणामी ओझोन थराचं नुकसान होतं. याव्यतिरिक्त सैनिकांचे कॅम्प लावणं आणि तिथे पोचण्याचे रस्ते बांधणं यासाठी सर्रास जंगलांची कटाई केली जाते. प्राण्यांना मारलं जातं, त्यांचा अधिवास हिरावून घेतला जातो. हे झाले वरवरचे आणि स्पष्टपणे जाणवणारे परिणाम. पण नीट लक्ष दिलं तर ही समस्या यापेक्षा कितीतरी पट भयंकर आहे.

दुसऱ्या महायुद्धात रसायनशास्त्रज्ञांनी हानिकारक रासायनिक बॉम्ब विकसित केले. जे उरले त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी मोठमोठ्या बॅरेल्समध्ये भरून थेट महासागरात टाकून देण्यात आले. धातूच्या बॅरेल्सचा वापर केल्यानं कालांतरानं ते विघटित होऊन ही रसायनं समुद्राच्या पाण्यात मिसळली गेली. हा सर्व प्रकार माणसांना वाचवण्यासाठी झाला असला तरी समुद्रातील वनस्पती आणि प्राण्यांसाठी मात्र ते धोक्याचं ठरलं. खाऱ्यापाण्याच्या प्रदूषणाला हा एकच घटक हानिकारक ठरला नाही तर या विश्वायुद्धच्या काळात नौदलाच्या जहाजांमधून अटलांटिक महासागरात प्रचंड प्रमाणात तेलगळती सुद्धा झाली. हे इतकं भीषण होतं की, आजही अटलांटिक महासागरात जहाजांच्या अपघातांमुळे झालेल्या या तेलगळतीचे पुरावे पाहता येऊ शकतात.

सैन्य हे संपूर्णपणे पर्यावरण विरोधी नाही. पर्यावरणाचं संरक्षण करण्यामध्ये लष्करी तुकड्या अग्रेसर असल्याचीदेखील उदाहरणं आहेत. भारतातील भुज इथे असलेल्या लष्करी सैन्यानं त्या क्षेत्रातील जमिनीचं व्यवस्थापन आणि संरक्षण करण्यात सामान्य नागरिकांना मदत केलीये. व्हेनेझुएलामध्ये, नैसर्गिक संसाधनांचं संरक्षण करणं हा सैनिकांच्या जबाबदाऱ्यांचा एक भाग आहे. पर्यावरणासाठी अनुकूल अशा तंत्रज्ञानाच्या वापरावर लष्कराचा भर असतो. विनाशकारी संघर्षातून जाऊन सुद्धा पर्यावरणाचं यशस्वीपणे पुनर्वसन केलं जाऊ शकतं याचं हे उत्तम उदाहरण आहे.

युद्ध आणि सशस्त्र संघर्ष यामुळे होणारं पर्यावरणाचं शोषण रोखण्यासाठी टप्प्याटप्प्यानं शांताता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न होणं गरजेचं आहे. आंतराष्ट्रीय पातळीवर इंटरनॅशनल पीस ब्युरो, पीस वन डे, पीस नाऊ, अँटी वॉर कमिटी यांसारख्या अनेक संस्था त्यासाठी कार्यरत आहेत.

**-जयश्री पाटील**




# आता व्हॉट्सॲपवरून एचडी क्वालिटीचे फोटो पाठवता येणार

व्हॉट्सॲप आपल्या आयुष्यातील एक महत्वाचे घटक झाले आहे. दर मिनिटाला व्हॉट्सॲप चेक करण्याची सवय सध्या अनेकांना लागली आहे. या प्लॅटफॉर्मचा वापर कामासाठीही केला जात आहे. व्हॉट्सॲपने बिझनेस ॲपही आणले आहे. त्यामुळे अनेकांनी या प्लॅफॉर्मचा वापर बिझनेससाठी केला आहे, यावरुन फोटो पाठवले जातात. पण, आता पाठवलेले फोटो खराब क्वालिटीचे जातात, आता व्हॉट्सॲपने एक नवे फिचर लाँच केले आहे. यावरुन आपण एचडी क्वालिटीचे फोटो पाठवू शकतो. हे फिचर आपल्याला फक्त सेटींग करून सुरू करायचे आहे. चला जाणून घेऊया हे फिचर सुरू कसे करायचे.




आतापर्यंत आपण व्हॉट्सॲपववरून कमी गुणवत्तेचे फोटो आपोआप पाठवत होतो, कारण डेटाचा वापर कमी होईल आणि मेसेज लवकर पाठवता येईल म्हणून आपण कमी क्वालिटीचा फोटो पाठवत होतो. आता तुम्ही ते फोटो हव्या त्या क्वालिटीचे हवे तसे पाठवू शकता. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही व्हॉट्सॲपवर उच्च दर्जाचे फोटोही पाठवू शकता. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन काही बदल करावे लागतील.

पहिल्यांदा तुम्हाला व्हॉट्सॲप ओपन करावे लागेल. येथे वर दिलेल्या तीन डॉटवर क्लिक करा. आता तुमच्या समोर अनेक पर्याय दिसतील, यामध्ये तुम्ही सेटिंगवर क्लिक करा.

सेटिंग्जमध्ये तुम्हाला स्टोरेज आणि डेटामध्ये जावे लागेल. येथे तुम्हाला फोटो अपलोड क्वालिटीचा पर्याय दिसेल. यावर क्लिक करा तुमच्यासमोर एक नवीन विंडो उघडेल, ज्यामध्ये तीन पर्याय उपलब्ध असतील. पहिला पर्याय ऑटो आहे, जो डीफॉल्टनुसार निवडला जाईल.

याशिवाय तुम्हाला डेटा सेव्हर आणि बेस्ट क्वालिटीचा पर्याय मिळेल. ऑटो ऑप्शनवर नेटवर्क क्वालिटीनुसार फोटो पाठवले जातील. फोनमध्ये येणाऱ्या डेटानुसार ॲप फोटो पाठवेल. हाच पर्याय महत्वाचा आणि फायद्याचा आहे. जर तुम्हाला चांगल्या गुणवत्तेत फोटो पाठवायचे असतील तर तुम्ही सर्वोत्तम गुणवत्ता निवडू शकता. त्यासाठी थोडा अधिक डेटा खर्च होतो. यासाठी तुमच्या इंटरनेटचा स्पीड जास्त असणे हेही गरजेचे आहे.

# विविध भूमिका साकारणारे अभिनेते संजीवकुमार

संजीव कुमार यांना बॉलिवूड हरी भाई म्हणायचे. त्यांचे खरे नाव हरिहर जेठालाल जरीवाला होते. जरी आज संजीव कुमार जगात नाहीत तरीदेखील त्यांच्या अभिनयाची छाप आजही त्यांच्या चाहत्यांच्या मनात तशीच आहे. संजीव यांना अभिनयाचा छंद जडला. ते इतरांशी जोडले गेले आणि रंगमंचावर काम करू लागले. तेव्हा त्यांनी भारतीय राष्ट्रीय रंगमंचाच्या माध्यमातून बऱ्याच नाटकात कामे केलीत. अशा प्रकारे त्यांनी आपल्या जीवनाची सुरुवात केली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी माहिती.



संजीव कुमार यांचा जन्म ९ जुलै १९३८ साली झाला. त्यांचे जन्म नाव हरिहर जरीवाला होते, परंतु प्रेमाने सर्व नातेवाईक आणि नातेवाईकांनी त्यांना हरिभाई जरीवाला म्हणून ओळखत. त्यांचे वडिलोपार्जित घर सूरत असले तरी चित्रपटसृष्टीच्या इच्छेने त्यांना मुंबईत आणले.

संजीव कुमारने लग्न केले नाही परंतु अनेक वेळा प्रेम केले. त्यांना एक अंधश्रद्धा होती की, त्यांच्या कुटुंबात मोठा मुलगा १० वर्षांचा झाल्यावर वडिलांचा मृत्यू होतो. हे त्याचे आजोबा, वडील आणि भाऊ सर्वजणांसोबत घडले होते. संजीव कुमारने आपल्या दिवंगत भावाच्या मुलाचा दत्तक घेतला आणि दहा वर्षांचा असताना मरण पावला.

संजीव कुमार यांचा 'हम हिंदुस्तानी' हा पहिला चित्रपट होता. यानंतर त्यांनी बऱ्याच चित्रपटातून छोट्या-मोठ्या भूमिका केल्या आणि हळूहळू आपली ओळख निर्माण केली. यानंतर १९६८ मध्ये प्रदर्शित झालेला 'राजा और रंक' चित्रपटाच्या यशानंतर संजीव इंडस्ट्रीमध्ये खऱ्या अर्थाने उभे राहिले. 'संघर्ष' मध्ये त्यांनी दिलीपकुमार यांच्यासोबत छोटीशी भूमिका साकारली होती. त्या छोट्याशा भूमिकेतूनही त्यांनी आपल्या अभिनयाची एक वेगळीच छाप सोडली. दिलीप साहेब देखील तेव्हा त्यांच्या अभिनयाने खूप प्रभावित झाले होते. संजीव कुमार आणि शत्रुघ्न सिन्हा यांची घट्ट मैत्री होती.

'खिलौना' चित्रपटात संजीव यांच्या सांगण्यावरूनच शत्रुघ्न यांना खलनायकाची भूमिका मिळाली होती.

संजीव कुमार यांनी आपल्या करिअमध्ये अनेक प्रयोग केले. जेव्हा जेव्हा त्यांना संधी मिळाली तेव्हा त्यांनी केवळ नायक म्हणून काम न करता प्रौढ व्यक्तीच्या भूमिकाही साकारल्या. रंगमंचावर काम करत असताना संजीव कुमार यांनी वयाच्या २२ व्या वर्षीच ६० वर्षांच्या व्यक्तीची भूमिका साकारली होती.

संजीव कुमार यांना १४ फिल्मफेअर पुरस्कारांसाठी नामांकन देण्यात आले होते, तीनदा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेते म्हणून तर उर्वरित सर्वोत्कृष्ट अभिनेता. त्यांनी दोनदा सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून आणि एकदा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून पुरस्कार जिंकले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार जिंकला. सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार जिंकला. संजीव कुमार यांच्या स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट अभिनेता, दिग्दर्शक आणि बॅकस्टेज तंत्रज्ञ यांना दरवर्षी पुरस्कार आणि रोख बक्षिसे दिली.

संजीव कुमार यांनी ६ नोव्हेंबर १९८५ रोजी अखेरचा श्वास घेतला. संजीव कुमार यांच्या निधनानंतर त्यांचे दहापेक्षा जास्त चित्रपट प्रदर्शित झाले. बऱ्याच चित्रपटांची शूटिंग बाकी होती.

कथा बदलून हे प्रदर्शित केले गेले. संजीव कुमार यांचा 'प्रोफेसर की पडोसन' हा शेवटचा चित्रपट १९९३ मध्ये प्रदर्शित झाला होता.

**(साभार : मराठी मोल)**

**क्लिक...क्लिक...!**



**रोहा : म्हशीवर स्वार होउन बगळे निघाले फिरायला. भुवनेश्वर येथील हे दृश्य महादेव सरसंबे यांनी टिपले आहे.**

## आरोग्य प्रहर



# थंडीतील आजारांवर सर्दीसाठी घरगुती उपाय

हवामानात बदल होत असल्याने सर्दी होणे सामान्य आहे. ही समस्या कोणालाही होऊ शकते. आता हिवाळ्याच्या हंगामात सर्दी होणं सामान्य आहे.सर्दी सहसा काही दिवसात स्वतःहून बरी होते, परंतु काहीवेळा ती जास्त काळ टिकते. अशा परिस्थितीत बरेच लोक औषधे घेतात, त्यामुळे सर्दी बरी होते, परंतु ती परत येण्याची शक्यता असते. कधी कधी सर्दी गंभीर स्वरूप धारण करते. अशा वेळी सर्दी-सर्दीवर वेळीच घरगुती पद्धतींनी उपचार केल्यास लवकर आराम मिळू शकतो.

थंडीच्या सुरुवातीच्या दिवसांची स्थिती आहे. या अवस्थेत सर्दी झालेल्या व्यक्तीला फारसा त्रास होत नाही. या दरम्यान नाक वाहणे आणि सौम्य सर्दी होऊ शकते, जी लवकरच बरी होण्याची शक्यता आहे. सर्दी होण्याची अनेक कारणे असू शकतात

**सर्दीची लक्षणे-** वारंवार शिंका येणे, नाक बंद, वाहणारे नाक, घसा खवखवणे, खोकला, घशातील श्लेष्मा, पाणीदार डोळे, ताप, कोणत्याही गोष्टीचा वास घेण्यास त्रास होणे, डोकेदुखी, स्नायू दुखणे, भूक न लागणे

**सर्दी साठी घरगुती उपाय**

**कोमट किंवा मिठाच्या पाण्याने गुळणे करा-** कोमट पाण्यात मीठ घालून चांगले मिसळा. नंतर त्या पाण्याने गार्गल करा. तुम्ही फक्त कोमट पाण्याने गारगल करू शकता. तुम्हाला आराम मिळत नाही तोपर्यंत तुम्ही हे दिवसातून दोनदा करू शकता.

**दही-** हे जेवणासोबत किंवा जेवणापूर्वी किंवा नंतर खाल्ले जाऊ शकते. दिवसभरात दोन कप दही खाऊ शकता.

**आले-** आले किसून घ्या आणि नंतर काही मिनिटे गरम पाण्यात घालून उकळवून घ्या. यानंतर पाणी गाळून त्यात मध मिसळा. आता या आल्याच्या चहाचा आनंद घ्या. दोन-तीन कप आल्याचा चहा दिवसभर पिऊ शकतो.

**लसूण-** लसणाच्या पाकळ्या कुस्करून घ्या. आता त्यात मध मिसळून खा. दिवसातून किमान दोनदा याचे सेवन करा. याशिवाय भाजीमध्येही लसूण वापरता येतो.

**मध -** मध थेट सेवन केले जाऊ शकते. तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दुधात मध मिसळून पिऊ शकता. जोपर्यंत तुम्हाला आराम मिळत नाही तोपर्यंत तुम्ही दिवसातून किमान दोनदा मधाचे सेवन करू शकता.

# उपचारपेक्षा प्रतिबंध चांगला – माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील

## भाजपच्या वतीने पेणमध्ये कॅन्सर तपासणी शिबिर



**पेण : प्रतिनिधी**

कॅन्सर मुक्त महाराष्ट्र अभियानांतर्गत भाजप कोकण जैन प्रकोष्ठ आणि भारतीय जनता पक्ष पेण मंडल यांच्या संयुक्त विद्यमाने येथील बस स्थानकात मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. 'रोग झाल्यानंतर उपचार करुन घेण्यापेक्षा, तो होऊ नये याची काळजी घेणे चांगले, असे प्रतिपादन प्रीतम पाटील यांनी यावेळी केले.

प्रीतम पाटील पुढे म्हणाल्या की, आपले आरोग्य चांगले राखण्यासाठी प्रत्येकाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी येथे मोबाइल कॅन्सर तपासणी व्हॅन आणण्यात आली असून, भाजपच्या वतीने राबिवण्यात येणाऱ्या कॅन्सरमुक्त महाराष्ट्र अभियानात सहभाग घेऊन नागरिकांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी.

पेणच्या माजी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, कोकण विभाग जैन प्रकोष्ठ प्रमुख दर्शन बाफना, माजी नगरसेविका देवता साकोस्कर, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर, भाजप कोकण नेते विनोद शहा, पेण शहर अध्यक्ष हिमांशू कोठारी, युवा अध्यक्ष मितेश शहा, डॉ. जगदीश केसकर, डॉ. अशोक लवाटे, संजय कडू, हेमेंद्र जैन, कन्हैया पूनमीया, अभिराज कडू, आदींसह मान्यवर या वेळी उपस्थित होते.

ललित गांधी फाऊंडेशन, ग्लोबल मारवाडी फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचा या अभियानात सहभाग असून भाजप जैन प्रकोष्ठचे प्रदेश प्रमुख संदीप भंडारी यांच्या माध्यमातून हे शिबिर राबिवण्यात येत आहे. विविध प्रकारच्या मशिनद्वारे चाचण्यांच्या माध्यमातून कॅन्सरचे निदान करण्यात येत आहे. पेणमधील शिबिरात ४० नागरिकांची तपासणी करण्यात आली.

**आपले आरोग्य चांगले राखण्यासाठी प्रत्येकाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. भाजपच्या वतीने राबिवण्यात येणाऱ्या कॅन्सरमुक्त महाराष्ट्र अभियानात सहभाग घेऊन नागरिकांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी.**
**–प्रीतम पाटील, माजी नगराध्यक्षा,**



# मादांटणे येथे अल्पवयीन मुलीवर बलात्कार

## म्हसळा पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

### आरोपीला तत्काळ अटक

**म्हसळा : प्रतिनिधी**

तालुक्यातील मादांटणे येथील अल्पवयीन मुलीवर (वय १६) बलात्कार केल्याची घटना घडली असून, या प्रकरणी पीडित मुलीच्या वडीलांनी दिलेल्या फिर्यादीवरून म्हसळा पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केली. म्हसळा तालुक्यातील मादांटणे गावामधील ३८ वर्षाच्या नराधमाने मंगळवा ते गुरुवार या कालावधीत एका घरामागील पडवीत अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला.




त्याबाबत पीडित मुलीच्या वडिलांनी फिर्याद दाखल करताच म्हसळा पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात भादंवि कलम ३७६, ३५४(–),(इ)बालक लैंगिक कृत्ये संरक्षण कायदा २०१२ (पोक्सो), ४,८,१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे आणि तपासी अंमलदार वाय. पी. बांडे यांनी आरोपीला तात्काळ अटक केली.

# क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक करणाऱ्या सहा वाहनांवर म्हसळा पोलिसांची कारवाई

**म्हसळा : प्रतिनिधी**

क्षमतेपेक्षा अधिक मालवाहतूक करणाऱ्या सहा ट्रकवर म्हसळा पोलिसांनी शुक्रवारी (दि. ४) साई चेकपोस्ट येथे नाकाबंदी दरम्यान कारवाई केली.

रस्ता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून दिघी–पुणे या राष्ट्रीय महामार्गावर क्षमतेपेक्षा जादा मालवाहतूक करणाऱ्या वाहनांविरोधात शासनाने कडक धोरण स्वीकारले आहे. मालवाहतूक करणाऱ्या सहाचाकी वाहनांना ९ ते १० टन तसेच १० चाकी वाहनांना सुमारे १५ ते १६ टन वाहतूक करण्याची परवानगी आहे. त्यापेक्षा जास्त मालवाहतूक करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाते. पहिल्या टनाला अडीच हजार रुपये असून त्यापुढील टनाला प्रति हजार रुपये दंडाची रक्कम वाढण्यात येते. दिघी पोर्ट येथून क्षमतेपेक्षा अधिक मालवाहतूक करणारे २६ट्रक महाड औद्योगिक वसाहतीकडे आणि चार ट्रक पुणे औद्योगिक वसाहतीकडे निघाले असल्याची माहिती म्हसळा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक निरीक्षक संदीपान सोनावने यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा पोलिसांनी शुक्रवारी साई चेकपोस्ट येथे किमान क्षमतेपेक्षा जास्त आणि उंचलोड असलेले कोळशाची वाहतूक करणारे सहा ट्रक ताब्यात घेऊन मोटार वाहन कायदा कलम १९४, मोटार अधिनियमाप्रमाणे गुन्हे दाखल केले. पुढील तपास पोलीस नाईक निलेकर करीत आहेत.



# पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन शिबिराला रोह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातर्फे शनिवारी (दि. ५) रोह्यातील म्हाडा कॉलनी मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राज्य शासनाने पोलीस भरतीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे व रोहा पोलीस उपविभागीय अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली रोह्यातील म्हाडा कॉलनी मैदानावर शनिवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत पोलीस भरतीपूर्व एक दिवसीय मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या वेळी नागोठणे पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजन जगताप, सहाय्यक निरीक्षक सुभाष जाधव, उपनिरीक्षक विनोद वायंगणकर, महिला उपनिरीक्षक सोनी जवारे यांच्यासह पोलीस कर्मचारी व प्रशिक्षक उपस्थित होते.



नाझ सिक्युरिटी एजन्सी ट्रेनिंग सेंटर यांच्या सौजन्याने रोह्यातील म्हाडा कॉलनी मैदानावर घेण्यात आलेल्या या एकदिवसीय शिबिरात तालुक्यातील १२० मुले तर ४० मुलीं सहभागी झाल्या होत्या, अशी माहिती प्रमोद बाबर यांनी दिली.

# रायगडातील पक्ष्यांची अनोखी दुनिया









**पाली सुधागड़सह रायगड जिल्ह्यात विशेषतः** पावसाळ्यात विविध पक्ष्यांचे दर्शन घडते. या पक्ष्यांची अनोखी दुनिया माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील पक्षी निरीक्षक व स्वदेस फाउंडेशन म्हसळा तालुका व्यवस्थापक शिवतेज ढऊळ यांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली आहे. यामुळे जिल्ह्यातील विशेषतः पाली सुधागड, माणगाव व म्हसळा तालुक्यातील विविध पक्षांची रंजक माहिती छायाचित्राच्या माध्यमातून समोर आली आहे. त्यांनी हे छायाचित्रे व माहिती समाज माध्यम व इन्स्टाग्रामवर सुद्धा ठेवले आहेत. त्यांचा इंस्टाग्राम आयडी shivte_jdhaul या नावाने आहे.

साधारण जुन ते ऑक्टोबरदरम्यान शिवतेज यांनी या पक्षांचे निरीक्षण करून त्यांची छायाचित्रे घेतली आहेत. जिल्ह्यातील पर्यावरण व निसर्गसंपदा पक्षांच्या अधिवास व प्रजननासाठी अनुकूल असल्याचे यावरून सिद्ध झाले आहे. तसेच येथे स्थलांतरित पक्षीदेखील मुबलक प्रमाणात येत आहेत.

**काळा शराटी –** हा दिसायला अतिशय देखना पक्षी आहे. याला काळा अवाक किंवा काळा कंकर देखील म्हणतात. नद्यांचा काठ, तलाव, दलदली या भागात रहाणे शराटीला आवडते. मार्च ते ऑक्टोबर हा या पक्ष्याचा विणीचा काळ असून याचे घरटे मोठे, काटक्या, पिसे वगैरे वापरून केलेले असते.

**मलबारचा तुरेवाला चंडोल –** हा माळरानात राहणारा पक्षी असून जमीनीवर घरटे करतो. गवताळ भागात, दगड–कपारीत असलेले विविध कीटक व बिया हे याचे खाद्य आहे. त्याचा तुरा विशेष असतो.

**शिक्रा –** हा मानवी वस्ती तसेच विरळ झाडे–झुडपे असलेल्या भूप्रदेशात आढळणारा शिकारी पक्षी आहे. याचे मुख्य खाद्य लहान पक्षी, सरडे, पाली तसेच इतर पक्ष्यांची अंडी हे आहे. हा पक्षी वरून गडद तपकिरी आणि फिकट करडा असतो. पोटाकडून पिवळट असून, त्यावर मधून–मधून काळे पट्टे असतात.

**ब्राम्हणी घार (समुद्री घार किंवा ब्राम्हणी घार) –** ही समुद्राजवळ आढळणारी घार, ब्राम्हणी या रंगछटेची ही घार असते. मासे व कुजलेले समुद्री खाद्य हे मुख्य खाद्य असते. डोके, छाती व पोट पांढरे असलेला, घारीएवढा एक पक्षी. ब्राह्मणी घारीचे नर आणि मादी दिसायला सारखे असतात.

**तिबोटी खंड्या –** हजारो किमीचा प्रवास करून परदेशी पाहुणा तिबोटी खंड्या





जिल्ह्यात दाखल होतो. या पक्षाच्या सुंदर दिसण्यामुळे आणि विशिष्ठ जीवनशैलीमुळे याला रायगड जिल्ह्याचा पक्षी म्हणून नुकताच बहुमान मिळाला आहे.

**सुगरण व गप्पीदास (सायबेरीयन स्टोनचाट)–** झाडांच्या उंच फांद्यांवर सुगरणीने घरटे बांधले आहेत. आणि या घरट्यांवर आपल्या पिल्लांना खाऊ घालण्यासाठी येणाऱ्या सुगरणीचे सुरेख छायाचित्र टिपण्यात आले आहेत. तसेच गप्पीदास (सायबेरीयन स्टोनचाट) या छोट्या पक्षाला गवतावर फिरून लहान मोठे किडे पकडताना टिपले आहे.

**वेडा राघू –** भारतात हा मोठ्या प्रमाणात दिसतो. तरी देखील पक्षी–निरीक्षकांच्या मते गेल्या काही वर्षात याची संख्या खूपच कमी झाली आहे. हा पक्षी तारेवर बसलेला असताना उडून जातो, आणि भक्ष्य पकडून पुन्हा तारेवर येऊन बसतो. परत परत त्याच जागी येत असल्यामुळे त्याला 'वेडा राघू' असे नाव पडले आहे.

**अडई –** अडई, अरई किंवा मराल या नावाने ओळखतात. हा पक्षी बदक पेक्षा लहान असतो. हे पक्षी लाल रंग चिला व गाद या वनस्पतीनी भरलेल्या तळ्यात थव्यानी राहतात. हे पक्षी उडताना सी सिक अशी सतत शिळ ऐकू येते. जून ते ऑक्टोबर या काळात वीण करतात.

**गिधाड –** गिधाडे हे निसर्गातील सफाई कर्मचारी असतात. गिधाडे ही अन्न साखळीतील महत्त्वाचा दुवा आहेत. उत्क्रांतीमध्ये त्यांच्या शरीरात अनेक बदल झाले आहेत. जिल्ह्यात गिधाडांच्या विविध जाती आढळतात.

**मलबारी कवड्या धनेश –** या पक्ष्यांची चोच फार मोठी व सिंगासारखी असल्यामुळे यांना इंग्रजी भाषेत हॉर्नबिल हे नाव दिलेले आहे. हा जंगलात राहणारा पक्षी असून फार मोठ्या व उंच झाडांवर लहान थवे करुन ते राहतात. शिवतेज यांनी त्याला कॅमेरात टिपले आहे.

**पोपट व मोर –** मोर व पोपटाला निसर्गात मुक्त फिरतांना व आकाशात भरारी घेतांना शिवतेज यांनी टिपले आहे.

**–धम्मशील सावंत, पाली**










# वाचन सकारात्मक बदल घडविते


कवयित्री सायराबानू वजीर चौगुले, (माणगाव, रायगड)


**वाचाल तर वाचाल**
**साहित्यिकांची आवडती पुस्तके**

**दैनंदिन जीवनात वाचनाचा होणारा सर्वांत मोठा फायदा म्हणजे ज्ञान संपादन होय. आज इंटरनेटच्या युगात आपल्या विविध सोशल मीडियाद्वारे माहिती मिळत असली तरी अजूनही ज्ञान मिळवण्यासाठी ग्रंथांना आणि वाचनाला पर्याय झालेला नाही. आज कुठलाही विषय असूद्यात त्याबद्दल पुस्तके उपलब्ध आहेत. कुठल्याही विषयाची अगदी मुळातून माहिती घेण्यासाठी पुस्तकासारखा दुसरा पर्याय नाही. वाचन करण्यासाठी वेळ देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पुस्तक वाचल्याने आपले ज्ञान वाढते आणि आपण हुशार बनतो. कधी कधी आपल्या आयुष्यात असे काही क्षण येतात जेव्हा आपण हताश वाटतो, आपण निराश होऊन हार न मानता जीवनातील आशा गमावतो. अशा काळात, एक चांगले पुस्तक वाचून आपली विचार करण्याची पद्धत बदलू शकते, आशा आणि प्रेरणा मिळते. वाचनाची सवय आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकते.**





## माझी आत्मकथा
**-डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

'माझी आत्मकथा' डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र असलेले पुस्तके आपल्याला त्यांच्या काळात घेऊन जाते. तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाचे दर्शन घडवते. त्यांनी दिलेल्या काही घटनांवरून आपणास एक नवा विचार मिळतोच, परंतु त्याचबरोबर काही गोष्टींचा नवा संदर्भ आणि नवी दिशा मिळते. या त्यांच्या आत्मकथेमध्ये डॉक्टर आंबेडकरांचे राष्ट्रीय काँग्रेस आणि गांधीजींची असलेले संबंध आणि विचार वाचून थक्क व्हायला होते. त्यामुळे प्रत्येकाने 'माझी आत्मकथा' हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पुस्तक वाचावयास हवे. भारताच्या जडणघडणीतील व स्वातंत्र्यप्राप्तीमधील अनेक दुवे या पुस्तकात वाचावयास मिळतात.





## प्रेषित मुहम्मद
**-सय्यद हामिद मोहसिन**

'प्रेषित मुहम्मद' हे पुस्तक इस्लाम धर्माच्या जीवनाचे दर्शन घडवते. तसेही आज समाजामध्ये इस्लाम धर्माविषयी अनेक गैरसमज आहेत, परंतु हे पुस्तक इस्लाम धर्म कसा उदयास आला त्यासाठी इस्लाम धर्माचा पाया रोवणाऱ्या मुहम्मद पैगंबर(स) यांना किती संघर्ष करावा लागला हे दर्शविते. प्रेषित मुहम्मद पैगंबर(स) करूणेचा सागर कसे होते, त्यांचे मुस्लिमेतरांशी व्यवहार कसा होता हे सर्व या पुस्तकात वाचायला मिळते. मोहम्मद पैगंबर(स) जगाला कळावेत म्हणून पुस्तक मराठी भाषेत विनामूल्य ९८८१४९५८१० या नंबरवर संपर्क साधला असता उपलब्ध करून दिले जाते.




## आय डेअर
**-परमेश डांगवाल**

'आय डेअर' हे किरण बेदी यांच्या पुस्तकात किरण बेदी यांच्या पोलीस महासंचालक या पदावरील कारकीर्द पाहाव्यास मिळते. तळागाळातील समाजामध्ये गुन्हेगारीचे स्वरूप व कारणेही या पुस्तकातुन स्पष्ट होतात. किरण बेदी यांचे एक अधिकारी म्हणुन गुन्हेगारांशी असलेले संबंध व त्यांनी या गुन्हेगारांना सुधारण्यासाठी आपुलकीने केलेले प्रयत्न मनाला भावतात. तसेच व्यवस्थेपुढे व राजकारण्यांपुढे चांगुलपणाला स्थान नाही ही बाब शेवटी मनाला चटका लावून जाते. गुन्हेगारी जगतातील भयानकता या पुस्तकात पहायला मिळते. एक स्त्री किती? आणि काय करू शकते? आपण काय करायला हवे? आपण कुठे आहोत? याचे हे पुस्तक आत्मपरीक्षण करायला लावते.




## प्रकाशवाटा
**-डॉ. प्रकाश आमटे**

'प्रकाशवाटा' हे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश आमटे लिखित पुस्तक खूपच प्रेरणादायी आहे. पुस्तक वाचायला सुरुवात केली की त्यांच्या जीवनातील एक एक धाडसी घटना उलगडत जातात. हेमलकसामधील त्यांच्या आदिवासी लोकांसाठी झटणाऱ्या संस्थेची संपूर्ण माहिती आपल्याला मिळते. त्याचबरोबर आदिवासींच्या सुखसुविधाविना, शिक्षणाविना असणाऱ्या खडतर जीवनात आमटे कुटुंबीयांनी कसा प्रकाश निर्माण केला हेही या पुस्तकात वाचायला मिळते. प्रकाश आमटे यांनी हिस्त्र प्राण्यांना लावलेली माया प्रेमाचे महत्त्व अधोरेखित करते. हे पुस्तक वाचताना वाचनलिंक तोडावीशी वाटत नाही. हे पुस्तक तुम्हाला जीवनात नवीन प्रकाश व नवीन वाटा दाखवते. माणूस म्हणून जगामध्ये जन्माला आलेला प्रत्येक जीव पोटासाठी झटतो, परंतु एक माणूस म्हणून जन्माला आल्यावर पोट भरण्याबरोबरच आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे काही देणे लागतो आणि ही सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आपल्या जीवनात छोटेसे सामाजिक कार्य करूनही जपता येते. गरजवंतांसाठी जगा त्यांना प्रेम, माया, थोडीशी मदत द्या या छोट्याशा कामाने काहींच्या जीवनात आपण आनंद फुलवू शकतो हा नवा विचार हे पुस्तक देते आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे. माझ्या जीवनावर या पुस्तकांनी खूपच मोठा प्रभाव टाकला आहे.

# नवी मुंबईत चोरीच्या घटनांत वाढ

## व्यावसायिकाच्या कार्यालयातून लाखोंची रोकड चोरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

चोरी करताना केवळ रोकड वा चीजवस्तूच नाही तर काहीही कामाच्या नसलेलेल्याही वस्तू चोरी होण्याचे प्रकार नवी मुंबईत गेल्या काही दिवसांपासून घडत आहेत. यात चोरट्यांना अशा वस्तूंचा काहीही फायदा होत नाही मात्र ज्याच्याकडे चोरी झाली त्याला मनस्तापाला सामोरे जावे लागते.



नवी मुंबईत गेल्या काही दिवसात झालेल्या चोरी प्रकरणात चोरट्यांनी रोकड दागिने चोरी केलेच आहेत शिवाय त्यांना काहीही उपयोग नसलेल्या वस्तूंचीही चोरी केली आहे. विनोद भाटीया यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांचे कार्यालय एपीएमसी मध्ये आहे. ते नेहमीप्रमाणे बुधवारी (दि. २) कार्यालय बंद करून घरी गेले दुसऱ्या दिवशी कार्यालयात चोरी झाल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी त्यांना दिली. त्यांनी कार्यालयात जाऊन पहिले असता त्यांच्या खोलीतील कपटाचे कुलुप तोडून आतील तीन लाख ८५ हजाराची रोकड चोरी झाल्याचे निदर्शनास आले. विशेष म्हणजे चोरट्यांनी सोबत त्यांच्या एका ट्रकचे आरसी बुक आणि ज्या कपाटाचे कुलूप तोडले त्याची कपाटात ठेवलेली किल्लीही चोरी केल्याचे निदर्शनास आले.

या बाबत एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्राथमिक तपासणीत कार्यालयातील शौचालयाच्या खिडकीची काच फोडून चोरट्यांनी आत प्रवेश केल्याचे निदर्शनास आले.

या चोरीत चोरट्यांनी तीन लाख ८५ हजारांची रोकडशिवाय ट्रकचे आरसी बुक, ज्या कपटाचे कुलूप तोडले त्याचीच आत ठेवलेली किल्लीही नेली. रोकड व्यतिरिक्त वस्तूंचा चोरट्यांना काहीही फायदा नाही, मात्र ज्याच्याकडे चोरी झाली त्याला नवीन आरसीबुक काढणे नवीन कुलूप किल्ली बनवून घ्यावे लागणार आहेत. यापूर्वीही वाशीतील चोरीत चोरट्यांनी बँकेतील लॉकरच्या किल्ल्या चोरी केल्या तर सीबीडी येथील दोन घरात चोरी करताना रोकड व दागिण्याव्यतिरिक्त उंची मद्य चोरले. या व्यतिरिक्त याच मद्याच्या रिकाम्या बाटल्याही सोबत घेऊन गेले होते. शिवाय घरात घेतलेल्या काही वस्तूंची देयकेही चोरी केले होते.

# पनवेलमधील पेशवेकालीन बापटवाडा जमीनदोस्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराला तलावांचे शहर म्हणून वेगळी ओळख आहे. या व्यतिरिक्त शहरातील ऐतिहासिक वाडे हीदेखील शहराची एक ओळख आहे. कालांतराने या वाड्यांची जागा टोलेजंग इमारती घेत आहेत. यापैकीच एक पेशवेकालीन बापटवाडा महापालिकेने जमीनदोस्त केला.



धोकादायक असल्याने महापालिकेने पोलिसांच्या फौजफाट्यासह जमीनदोस्त केला. पेशवेकालीन हा वाडा चिमाजी आप्पा यांनी वसईच्या स्वारीवेळी पनवेल याठिकाणी बांधला होता. या वाड्याला जवळपास ३०० वर्षे झाली. शहरातील ऐतिहासिक गोकुळाष्टमीचा सण या वाड्यात कित्येक वर्षांपासून साजरा होतो. सध्याच्या घडीला या वाड्यात १२ भाडेकरू वास्तव्यास होते, मात्र वाडा धोकादायक झाल्याने पालिकेने दीड महिन्यापूर्वी भाडेकरूंना नोटिसा बजावुन घरे खाली करण्याच्या सुचना केल्या होत्या. त्यानुसार वाडा जमीनदोस्त करण्यात आला. पालिकेचे अतिक्रमणविरोधी पथकाच्या उपस्थित एक जेसीबीच्या सहाय्याने हा वाडा जमीनदोस्त करण्यात आला.

या वेळी पोलिसांचा फौजफाटादेखील उपस्थित होता, अशी माहिती प्रभाग अधिकारी अमर पाटील यांनी दिली. पनवेल शहर कात टाकत आहे, मात्र बापट वाड्यासारखा शहरातील ऐतिहासिक वारसा नष्ट होत चालला आहे.

# नवी मुंबई आरटीओला तीन कोटींचा महसूल

## आकर्षक नंबरसाठी वर्षभरात ३४२८ जणांची नोंदणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**


मागील काही वर्षांपासून आपल्या गाडीला आवडीचा नंबर घेण्याची क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. नवी मुंबई शहरातदेखील हा ट्रेंड वाढत असून यावर्षी जानेवारी ते ऑक्टोबर पर्यंत एकूण ३४२८ जणांनी आपल्या आवडीचा नंबर घेतला असून यासाठी हजारो ते लाखो रुपये मोजण्यात आलेले आहेत. त्यामुळे यंदा या आकर्षक आवडीचा नंबरच्या नोंदणी शुल्क माध्यमातून वाशी आरटीओला ऑक्टोबर पर्यंत तब्बल तीन कोटी ४७ लाख ८१ हजार रुपये महसूल मिळाला आहे.

आजमीतिला लेटेस्ट वाहन मॉडेल खरेदी बरोबरच आपल्या गाडीचा नंबर कसा आकर्षित ठरेल? गाडीच्या नंबरने दुसऱ्यांचे लक्ष कसे वेधले जाईल, याला पसंती दिले जात आहे. त्यामुळे आरटीओकडून या एक अंकी, दोन अंकी, समान अंकी वाहनांच्या नंबर प्लेटची सिरीज निघताच वाहन धारकांचा हा आकर्षक नंबर घेण्यासाठी कल वाढत आहे. गाडीचा नंबर जेवढा आकर्षित तेवढी पत मोठी असते असा अनेकांचा समज आहे. गाडीला ठरावीक नंबर मिळावा, यासाठी आग्रही असणाऱ्यांचे संख्या वाढत आहे. एक अंकी, दोन अंकी किंवा तीन किंवा चारही आकडे समान असतील याला सर्वाधिक पसंती दिली जाते. कोणत्या क्रमांकासाठी किती पैसे लागतात हे आधीच ठरविण्यात आलेले असते. हौशी वाहन धारकांकडून आपल्या आवडीचा अपेक्षित असलेला वाहन क्रमांक मिळवण्यासाठी कमीत कमी तीन हजार ते जास्तीत जास्त तीन लाखांपर्यंत पैसे मोजले जात आहेत.

कोरोना काळात सर्वांचीच आर्थिक परिस्थिती बिकट होती. करोनादरम्यान वाहन खरेदी ही कमी प्रमाणात झाली होती. त्यामुळे मागील वर्षी जानेवारी २०२१ ते ऑक्टोबर २०२१ पर्यंत अवघे २३४ जणांनी आवडीचा नंबर घेण्याला पसंती दिली होती. त्यामुळे मागील वर्षी आरटीओला अवघे एक कोटी ९६ लाख ६३ हजार ५०० रुपये महसूल प्राप्त झाला होता, परंतु कोरोना कमी होताच तसेच नियम शिथिल होतात सर्व व्यवसाय, उद्योगधंदे रुळावर आले आहेत. त्यामुळे आता सर्वत्र सुलभ परिस्थिती आहे. त्यामुळे यंदा दसरा-दिवाळीच्या मुहूर्तावरदेखील जोरदार वाहन खरेदी झालेली आहे. त्याचबरोबर यावर्षी आकर्षक आवडीचा नंबर घेण्यासाठी हे अधिक पसंती दर्शवलेली दिसत आहे. त्यामुळे यंदा जानेवारी २०२२ ते ऑक्टोबर २०२२ पर्यंत ३४२८ जणांनी आवडीचा नंबर घेतला आहे. यातून आरटीओला तीन कोटी होऊन अधिक महसूल प्राप्त झालेला आहे.

> **नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे मागील वर्षीपेक्षा यंदा आकर्षक नंबर घेण्यासाठी अधिक पसंती दिली आहे. मागील वर्षी करोना परिस्थितीमुळे वाहन खरेदी ही मंदावली होती. त्यामुळे मागील वर्षी अवघे २३४ जणांनी अर्ज केला होता. यंदा मात्र तीन हजारांहून अधिक जणांनी आकर्षक नंबरसाठी पसंती दिली आहे.**
> **-हेमांगी पाटील, उपप्रादेशिक अधिकारी, आरटीओ नवी मुंबई**






# पावसामुळे द्राक्षांचा हंगाम लांबणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीच्या मुंबई कृषी उत्पन्न बाजारात समितीत नोव्हेंबर अखेर तसेच डिसेंबर पासून द्राक्षांच्या हंगामाला सुरुवात होत असते. मात्र, ऑक्टोबर महिन्यात पडलेल्या अवेळी पावसामुळे एक महिना उशिराने द्राक्षांची छाटणी झाली आहे. त्यामुळे यंदा बाजारात द्राक्ष दाखल होण्यासाठी जानेवारी महिना उजाडणार आहे. यावर्षी द्राक्षांचा हंगाम सुरू होण्यास विलंब होणार असल्याचे मत घाऊक व्यापारी व्यक्त करीत आहे.

साधारणतः एपीएमसी बाजारात नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये द्राक्ष फळाच्या आवक सुरू होते. तसेच जानेवारीमध्ये द्राक्षांचे प्रमाण अधिक वाढते. साधारण १५ नोव्हेंबरनंतर द्राक्षांची अधिक आवक सुरू होत असून १५ एप्रिलपर्यंत हंगाम सुरू असतो. बाजारात नाशिक, तासगाव, सातारा आणि सांगलीमधून अधिक आवक होत असते. मात्र यंदा पावसामुळे द्राक्षांची छाटणीलाच उशिरा सुरुवात झाली आहे ऑक्टोबर महिन्यात छाटणी करण्यात येणार होती ती पावसामुळे मात्र नोव्हेंबर महिन्यात करण्यात येणार आहे छाटणीला एक महिना उशीर झाल्याने उत्पादन घेण्याला ही विलंब होणार आहे परिणामी द्राक्ष बाजारात दाखल होण्यासाठी जानेवारी महिन्याची वाट पहावी लागेल, अशी माहिती सांगलीचे बागायतदार नंदकुमार पवार यांनी दिली आहे. त्यामुळे यंदा एपीएमसी बाजारात एक महिना उशिराने द्राक्षांच्या हंगाम सुरू होणार आहे.

# विस्टा प्रोसेस फूड्स कंपनीतर्फे पटवर्धन रुग्णालयास आर्थिक मदत



**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या विस्टा प्रोसेस फूड्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने पनवेल शहरातील रा. स्व. संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयास डायलेसिस रुग्णांना मदत म्हणून तीन लाख रुपयांचा धनादेश कंपनीचे एमडी भुपेंदर सिंग यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

या वेळी कंपनीचे एमडी भूपेंद्र सिंग यांनी दिलेला धनादेश रुग्णालयाचे कार्यवाह राजीव समेळ व मुख्य संचालक व्यवस्थापक सुनील लघाटे व रुग्णालय जनसंपर्क अधिकारी प्रसन्न खेडकर यांनी स्वीकारला. यासाठी कंपनीचे सल्लागार चंद्रशेखर सोमण यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या वेळी झालेल्या चर्चेत एमडी भूपेंद्र सिंग यांनी रुग्णालय करत असलेल्या कामाचे कैतुक केले. चार वर्षांपूर्वी त्यांनी डायलेसिस साठी लागणारा आर ओ प्लांन्ट बसवून दिला होता. डायलेसिसचे प्रमाण खूप वाढत आहे. गरीब रुग्णांना हा खर्च करणे न परवडणारा आहे. पटवर्धन रुग्णालयात दानशूर व्यक्तीच्या मदतीने केवळ ५०० रुपयात डायलिसिस केले जाते. हा दर अजून कमी करण्याचा रुग्णालयाचा विचार आहे. यासाठी मी कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याशी बोलून विदेशातून काही मदत करता येईल का यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. कंपनी व रुग्णालय या मधिल दुवा म्हणून कंपनीचे सल्लागार चंद्रशेखर सोमण यांचे रुग्णालय व्यवस्थापन समितीकडून विशेष आभार मानण्यात आले.

# खोपोलीत कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार

## ३४ जणांना अटक, ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

कोंबड्यांच्या पायाला धारदार हत्यार लावून त्यांची झुंज खेळवून चालणारा जुगार खोपोली पोलिसांनी छापा टाकून उघडकीस आणला असून, याप्रकरणी ३४ आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडून चार लाख ३१ हजार १९५ रुपये रोख रक्कम, १८ हजार ७०० रुपयाची दारू, ६६ लाख ९० हजार किमतीची वाहने असा एकूण ७१ लाख ७८ हजार १९५ रुपयांचा मुद्देमाल आणि ७६ फायटर कोंबडे पोलिसांनी जप्त केले आहेत.

रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना खोपोलीतील गगनगिरी आश्रम परिसरात असलेल्या तेज फार्महाऊसमध्ये धनाढ्यांचा



कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार चालत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती. घार्गे यांनी दिलेल्या, आदेशानुसार शुक्रवारी (दि. ४)रात्री पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक आर. कराड, स्वप्निल सावंत यांच्या पथकाने छापा टाकला, त्यावेळी मद्यपान आणि कोंबड्यांच्या पायांना धारदार हत्यार बांधून झुंजी रंगात आल्या होत्या. त्यावर जुगार सुरू असल्याचे दिसून आले. पोलिसांना पाहून सर्वांची पळापळ झाली. मात्र पोलिसांनी पळून जाणाऱ्या ३४ जणांची धरपकड केली. यावेळी २४ वाहने, झुंजीसाठी आणलेले फायटर जातीचे ७६ कोंबडे, विदेशी दारू साठा व रोख रक्कम असा एकूण ७१ लाख ७८ हजार १९५ रुपयाचा माल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात प्राण्यांना क्रूरतेने वागणूक आणि जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घाग यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी उपअधीक्षक संजय शुक्ला, खोपोली पोलीस ठाण्याचे शिरीष पवार, खालापूर पोलीस ठाण्याचे बाळा कुंभार उपस्थित होते.

**तेज फार्महाऊसची संपूर्ण माहिती घेण्यात येत असून सट्टा, जुगारासाठी नेहमी वापर व्हायचा का, याबाबत तपास सुरू आहे. झुंजीसाठी आणलेल्या कोंबड्यांना पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखभालीखाली ठेवण्यात आले आहे.**

**–सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

# माणगाव कडापूर येथे गोशाळेचे भूमिपूजन

## बेटर सोल फाउंडेशनेचा पुढाकार

**माणगाव : प्रतिनिधी**

'भारत विकास संगम' च्या रायगड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या बेटर सोल फाउंडेशन तर्फे माणगाव तालुक्यातील कडापूर येथील सृष्टि अग्रोफार्ममध्ये 'स्वर्णकमळ' या नावाची गोशाळा उभारण्यात येणार आहे. या गोशाळेचे भूमिपूजन शुक्रवारी (दि. ४) करण्यात आले. नियोजीत स्वर्णकमळ गोशाळेत १०० गायी ठेवण्याची व्यवस्था आहे. भविष्यात या गोशाळाचे रुपांतर गो–आनंदाश्रमात करण्यात येणार आहे. रस्त्यावर सोडलेल्या गाई, गुरे, घोडे, नको असलेली जनावरे व भेकड गायी, गुरांना या आनंदाश्रमात आश्रय देण्यात येणार आहे, अशी माहिती या वेळी फाउंडेशन तर्फे देण्यात आली.

विश्व हिंदू परिषदेचे कोंकण प्रांत धर्म प्रचारक सुनील जगताप, सनातन स्वामीजी, भाजप माणगाव तालुका उपाध्यक्षा यशोधरा गोडबोले, अशोक शेळके, जयपाल पाटील, वैभव डवले, चंद्रप्रकाश गोडबोले, विद्या बुरंबे, यश गोडबोले, पशुप्रेमी सुप्रिया बोस, अनिल वंगुले आदि मान्यवर स्वर्णकमळ गोशाळेच्या भूमिपूजनाला उपस्थित होते.





# माथेरानच्या हर्षा शिंदेची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

मिस हेरिटेज इंडिया हा किताब पटकवल्यानंतर माथेरानची कन्या हर्षा विनोद शिंदे हिची मलेशियात होणाऱ्या मिसेस व मिस हेरिटेज इंटरनॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ती मिस गटाचे प्रतिनिधित्व करणार आहे. कौलालमपूर येथे १४ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या मिसेस व मिस हेरिटेज इंटरनॅशनल स्पर्धेत जगभरातील सुमारे तीसहून अधिक देशातील स्पर्धक सहभागी होणार आहेत.

माथेरान येथील हॉटेल व्यवसायिक विनोद शिंदे आणि रेश्मा शिंदे यांची मुलगी हर्षा हिने २०२१ मध्ये विनर ऑफ द मिस हेरिटेज इंडिया व बेस्ट पर्सनॅलिटी विनर इन २०२१ हे पुरस्कार पटकावले आहेत. आता आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल हर्षा शिंदे हिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कोलाडमध्ये राष्ट्रीय एकता दिन

**रोहे : प्रतिनिधी**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जन्मदिनानिमित्त रोहा तालुक्यातील कोलाड येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना तर्फे राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला व एकता दिनाचे महत्त्व सांगण्यात आले.

या वेळी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांनी राष्ट्रीय एकतेची



शपथ घेतली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला अमोल गोलीपकर, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख अनिरुद्ध मोरे, प्रा. डॉ. एस. व्ही. अमलपुरे, प्रा. डॉ. सतीश सावळे, प्रा. नेहल प्रधान, प्रा. रेश्मा शेळके, प्रा. जयवंती अडलीकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरिता अर्ज करण्याचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत प्रत्येक वर्षी अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि राज्य शासनाची शिक्षण, परीक्षा शुल्क आदी योजनांचा लाभ देण्यात येतो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी विभागाच्या पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज भरणे आवश्यक आहे. सन २०२२–२३ या वर्षाकरिता प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी विहीत वेळेत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांनी केले आहे.

सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ झाला असून जिल्ह्यातील दोन हजार ३५५ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरले आहेत.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभाग तर विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गास इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शिष्यवृत्ती देण्यात येते. अनुसूचित जाती प्रवर्गातील ५६० तर विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गाचे एक हजार ७९५ अर्ज प्राप्त झाले आहेत.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास अडचण येऊ नये, याकरिता प्रत्येक महाविद्यालयात समानसंधी केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रात एका प्राध्यापकाची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती, फ्रीशिप शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो. उत्पन्न व प्रवर्गावर आधारित शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. अन्य शिष्यवृत्तीसाठीही अर्ज करता येतो.

महाविद्यालयांनी कार्यवाही करावयाचे वेळापत्रक: १ ते १५ नोव्हेंबर २०२२ मध्ये द्वितीय, तृतीय, अंतिम वर्ष विद्यार्थ्यांचे सन २०२२–२३ वर्षाकरिता नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे व २० ते ३० नोव्हेंबर २०२२ मध्ये नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज नोंदणी करून घेणे.

२०२२–२३ या शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस मागील महिन्यापासून प्रारंभ झाला आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील २३ हजार अर्ज येणे अपेक्षित असून केवळ दोन हजार ३५५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत.

विद्यार्थ्यांनी वेळेत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव यांनी केले आहे.

# खोपोलीत कॅन्सर तपासणी शिबिर

**खालापूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष जैन प्रकोष्ट आणि कोकण विभागीय उपाध्यक्ष किर्ती ओसवाल यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोलीतील लोहाना समाज सभागृहात बुधवारी (दि. २) मोफत कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. पनवेलचे माजी नगराध्यक्ष तथा भाजप खोपोली मंडळाचे संपर्क प्रमुख सुनिल घरत यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

कॅन्सर मुक्त अभियानांतर्गत





किर्ती ओसवाल यांनी हे मोफत कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित केले होते. शिबिरात अत्याधुनिक मशिनरीद्वारे तज्ज्ञ डॉक्टरांनी शिबिरार्थींची कॅन्सर तपासणी केली. सुनिल घरत यांनी या उपक्रमांचे कौतुक केले.

भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, भाजप खोपोली शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, उपाध्यक्ष दिलीप पवार, सेक्रेटरी हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, माजी नगरसेविका अपर्णा मोरे, कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख, अनिल कर्णूक, राहूल जाधव, गोपाळ बावसकर, हिंमत मोरे, महिला मोर्चाच्या खोपोली शहर अध्यक्षा शोभा काटे, सेक्रेटरी अश्विनी अत्रे, सुनिता महर्षी, स्नेहल सावंत आदींसह कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# मुरुडमध्ये संत नामदेव महाराज जयंती उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील शिंपी समाज मंडळाने शुक्रवारी (दि. ४)संत शिरोमणी नामदेव महाराजांची जयंती साजरी केली. सकाळी शिंपी समाज सभागृहात ग्रंथ परायण करण्यात आले.सायंकाळी पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. मुरूड शिंपी समाज मंडळाचे अध्यक्ष विजय करंबे, सुरेश सदरे, दर्शन करंबे, सिद्धेश करंबे, राजू कजबजे, अरुण करंबे, सिद्धेश लाखामदे, काशिनाथ वारगे, तेलवडे येथील वारकरी अनंत पाटील, दिनेश गोसावी, दीपेश पेरवे, विकी कामाने,



गजानन पाटील, राजपुरीच्या विठाबाई पाटील, अक्षदा पाटील, श्रद्धा कजबजे यांच्यासह शिंपी समाजातील महिला व पुरुष पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

# पोलादपुरातील धरणाचे आज भूमिपूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पैठण गोळेगणी परसुले धरणाचा भुमिपूजन सोहळा रविवारी (दि. ६) सकाळी १० वाजता रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला आहे. रायगड जिल्हा जलसंधारण अधिकारी मंगेश साठे, प्रकल्प अधिकारी बाबासाहेब शिंदे, ठेकेदार प्रकाश मेंगाणे पाटील यांच्यासह सर्वपक्षिय प्रतिनिधी या वेळी उपस्थित राहणार आहेत.

# परहूर येथील हार्डवेअर दुकानाला आग

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील परहूर येथील श्री समर्थ वृद्धाश्रमासमोरील राजेश थळे यांच्या हार्डवेअर दुकानाला गुरुवारी (दि. ३)रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास आग लागली. अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांनी ही आग आटोक्यात आणली. या घटनेत जीवितहानी झाली नसली तरी वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

अलिबाग तालुक्यातील परहूर येथील राजेश थळे यांच्या हार्डवेअर दुकानाला गुरुवारी



रात्रीच्या सुमारास आग लागली. परिसरातील ग्रामस्थांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आग विझविण्यासाठी आरसीएफ कंपनी व अलिबाग नगरपालिकेच्या अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. या अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसून वित्तीयहानी मात्र मोठ्या प्रमाणात झाली आहे. या घटनेत दुकानातील सामानाचे अंदाजे सुमारे १४ लाख ५७ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे दुकान मालक राजेश आत्माराम थळे यांनी सांगितले. या घटनेची नोंद अलिबाग पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

# खगोलतज्ज्ञांचा कापडे विद्यालयात आज मुक्तसंवाद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या कापडे येथील श्रीवरदायिना माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणामध्ये रविवारी (दि. ६) रात्री ८ वाजता पंचांगकर्ते व खगोलतज्ज्ञ दा. कृ. सोमण यांच्यासोबत मुक्त संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती विद्यालयाचे चेअरमन सीताराम सकपाळ यांनी दिली. मंडळाचे सदस्य अजय सलागरे मुक्त संवाद कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. पोलादपूर तालुक्यातील भुगोल, खगोल तसेच पंचागविषयक जिज्ञासू व्यक्तींनी बहुसंख्येने उपस्थित राहून दा. कृ.सोमण यांच्यासोबतच्या मुक्तसंवादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे

# माथेरानमध्ये जमशेदजी टाटा यांच्या जीवनकार्यावरील प्रदर्शन



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

टाटा फाउंडेशन तर्फे देशात विविध ठिकाणी प्रदर्शने भरवून जमशेदजी टाटा यांनी उद्योग जगतात केलेल्या कार्याची माहिती दिली जात आहे. या फाउंडेशनने माथेरानमधील कम्युनिटी हॉलमध्ये आयोजित केलेल्या अकराव्या प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी (दि. ५) अधीक्षक दीक्षांत देशपांडे यांच्या हस्ते आणि नगर परिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. जगातील प्रगत राष्ट्रांमध्ये भारताला मानाचे स्थान मिळवून देण्यात जमशेदजी टाटा यांच्या उद्योग समुहांचा महत्त्वाचा वाटा आहे. जमशेदजी टाटा यांच्या या अजोड कार्याची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी टाटा फाउंडेशन तर्फे ठिकठिकाणी प्रदर्शन भरवून त्यांचे जीवनचरित्र दाखविण्यात येत आहे. टाटा फाउंडेशनने माथेरान नगरपालिकेच्या सहकार्याने येथील कम्युनिटी हॉलमध्ये जमशेदजी टाटा यांच्या जीवनचरित्रावर आधारीत प्रदर्शन भरविले आहे. हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत असून या जीवनपटामुळे शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, हा याचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या प्रदर्शनाच्या उद्घाटन सोहळ्याला टाटा समूहाचे झुबिन मेस्त्री, व्हाईस प्रेसिडेंट राजेंद्र नारला, असिस्टंट मॅनेजर अभिजीत शेट्टे, प्रवीण सकपाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# आशियाई स्क्वॉश स्पर्धेत भारताला प्रथमच सुवर्ण

## कुवेतवर २-० असा विजय

**चिआँजू दक्षिण कोरिया : वृत्तसंस्था**

भारताच्या पुरुषांच्या स्क्वॉश संघाने इतिहास रचला. भारतीय संघाने कुवेतवर २-० असा विजय मिळवून शुक्रवारी (दि. ४)सुवर्णपदकाला गवसणी घातली. आशियाई स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धेमध्ये जेतेपद पटकावण्याची भारताची ही पहिलीच वेळ ठरली.

भारताच्या रमीत टंडन याने अली अरामेजी याच्यावर ११-५, ११-७, ११-४ असा विजय मिळवला. त्यानंतर सौरव घोषाल या अनुभवी खेळाडूने अमार अल्तामीमी याला ११-९, ११-२, ११-३ असे पराभूत केले आणि भारताला २-० असा विजय संपादन करून दिला. भारताने २-० अशी आघाडी घेतल्यामुळे अभय सिंग-फलाह मोहम्मद यांच्यामधील लढत खेळवण्यात आली नाही.




भारतीय संघाला मागील दोन स्पर्धांमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते, पण यंदा भारतीय संघाने सुरुवातीपासूनच छान खेळ केला. या स्पर्धेसाठी भारतीय पुरुष संघाला पहिले मानांकन देण्यात आले होते. या संघाने विजेता होत प्रतिमेला साजेशी कामगिरी केली.

भारतीय संघाने 'अ' गटामध्ये कतार, पाकिस्तान, कुवेत, दक्षिण कोरिया, चायनीज तैपई यांना पराभूत करीत गुणतालिकेत पहिल्या स्थानावर झेप घेतली. त्यानंतर उपांत्य फेरीत भारतीय पुरुष संघाने मलेशियाचे आव्हान २-१ असे परतवून लावत अंतिम फेरीत प्रवेश केला.

### महिला संघाला ब्राँझपदक

भारतीय पुरुष संघाने सुवर्णपदक पटकावून इतिहास रचल्यानंतर भारतीय महिलांनीही या स्पर्धेमध्ये ब्राँझपदक पटकावण्याची किमया केली आहे. भारतीय महिला संघाचा 'ब' गटात समावेश होता. या गटात भारतीय महिला संघाने इराण व सिंगापूरला नमवले, तसेच हाँगकाँगकडून त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. उपांत्य फेरीच्या लढतीत मलेशियाकडून २-१ असे पराभूत झाल्यामुळे भारतीय महिला संघाला ब्राँझपदकावर समाधान मानावे लागले. महिला संघाचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# पावसामुळे टी-२० विश्वचषक उपांत्य फेरीच्या नियमांत बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियामध्ये टी-२० विश्वचषक स्पर्धेचा थरार सध्या रंजक झाला आहे. सध्याच्या टी-२० विश्वचषकाच्या बाद फेरीसाठी आयसीसीने मोठा निर्णय घेतला आहे. आयसीसीने उपांत्य आणि अंतिम सामन्यांच्या अटी जाहीर केल्या आहेत. या अटी ग्रुप स्टेजच्या सामन्यांपेक्षा वेगळ्या आहेत.

उपांत्य आणि अंतिम सामन्यांसाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. पाऊस पडल्यास ज्या स्थितीत सामना होणार तेथून दुसर्‍या दिवशीची सुरुवात होईल. म्हणजेच हा सामना नव्याने खेळवला जाणार नाही. दोन्ही संघांमध्ये १०-१० षटकांचा खेळ झाल्यास तो डकवर्थ-लुईस नियमानुसार ठरवला जाईल. आधी पावसामुळे सामना झाला नाही तर, किमान ५-५ षटकांचा खेळ झाल्यानंतरच डकवर्थ-लुईस नियमाच्या आधारे निर्णय घेतला जात होता. उपांत्य फेरीच्या सामन्यात पावसामुळे चेंडू टाकला गेला नाही तर, त्यांच्या गटात अव्वल स्थानी असलेल्या संघाला विजेता घोषित केले जाईल.




गट टप्प्यात सर्वाधिक विजय मिळविणार्‍या संघाला अंतिम फेरीत प्रवेश दिला जाईल. त्याचवेळी अंतिम सामन्यात पावसाचा जोर कायम राहिल्यास आणि सामना होऊ शकला नाही, तर दोन्ही संघांना संयुक्तपणे विजेता घोषित केले जाईल.

# आशियाई अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत शिवा थापा उपांत्यपूर्व फेरीत



**अम्मान (जॉर्डन) : वृत्तसंस्था**

भारताच्या शिवा थापाने आशियाई अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत ६३.५ किलो वजनी गटातून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. पाच वेळा आशियाई पदक विजेता असलेल्या शिवाला या वेळी मंगोलियाच्या ब्याम्बात्सोगट तुगुल्डुरचा कडवा प्रतिकार सहन करावा लागला.

अत्यंत चुरशीच्या झालेल्या या लढतीत दोन्ही खेळाडूंनी सुरुवातीपासून कमालीचा आक्रमक खेळ केला. एकमेकांवर हल्ले-प्रतिहल्ले चढवण्याची स्पर्धाच दोघांमध्ये सुरू होती. पंचांना लढतीचा निकाल लावतानाही तेवढाच विचार करावा लागला.

अखेरीस शिवाचा अनुभव आणि वेगवान हालचाली निर्णायक ठरल्या. पंचांनी शिवाच्या बाजूने ३-२ असा कौल दिला. शिवाला या वेळी मंगोलियाच्या ब्याम्बात्सोगट तुगुल्डुरचा कडवा प्रतिकार सहन करावा लागला.

अन्य लढतीत ६७ किलो वजनी गटात भारताच्या अमित कुमारने तैवानच्या झेंग राँग हुआंगचे आव्हान एकतर्फी लढतीत परतवून लावले. अमितची गाठ आता उझबेकिस्तानच्या मुयडन्कहुजाएव असादखुजाशी पडणार आहे.

त्यापाठोपाठ ७१ किलो वजनी गटात सचिनने थायलंडच्या पीरापत यीसुन्हनोएनचा असा पराभव करून आगेकूच कायम राखली.

# 'खेलरत्न'साठी अचंता शरथ कमलची शिफारस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचा स्टार टेबल टेनिसपटू अचंता शरथ कमलची यंदाच्या मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे. याचबरोबर बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि कुस्तीपटू अंशू मलिकची अर्जुन पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे. ४० वर्षांच्या शरथ कमलने २०२२च्या राष्ट्रकुल स्पर्धेत दमदार कामगिरी केली होती. त्याने तीन सुवर्ण पदके आणि एक रौप्य पदक जिंकले होते.

यंदा खेलरत्नसाठी फक्त शरथ कमल या एकट्याच खेळाडूची शिफारस करण्यात आली आहे. शरथ कमलने आशियाई गेम्समध्येदेखील दोन वेळा पदक जिंकून दिले आहे. मनिका बात्रानंतर खेलरत्न पुरस्कार मिळवणारा शरथ हा दुसरा टेबल टेनिस खेळाडू ठरला आहे. यंदा एकूण २५ खेळाडूंची अर्जुन पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे. यात युवा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन, बॉक्सर निखत झरीन आणि बुद्धीबळपट्टू प्रज्ञानंदा, कुस्तीपटू अंशू मलिक यांचादेखील समावेश आहे.

# इंग्लंडची उपांत्यफेरीमध्ये धडक

## श्रीलंकेवर चार विकेट्सने विजय

**सिडनी : वृत्तसंस्था**

सिडनी येथे टी-२० विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडने श्रीलंकेवर चार विकेट्सने विजय मिळवला. त्याचबरोबर स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळविले. श्रीलंकेने इंग्लंडला १४२ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात इंग्लंडने १९.४ षटकांत सहा गडी गमावून १४४ धावा केल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलिया संघाचा पत्ता कट झाला आहे.

श्रीलंकेने १४२ धावांचे लक्ष्य दिले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंड संघाकडून जोस बटलर आणि ॲलेक्स हेल्सने पहिल्या विकेट्साठी शानदार ७१ धावांची भागीदारी रचली. त्यामुळे इथेच इंग्लंड संघाचा विजय झाला. त्यानंतर जोस बटलर २८ धावा करून बाद झाला. त्यानंतर ॲलेक्स हेल्स आणि बेन स्टोक्सने अनुक्रमे ४७ आणि ४२ धावांची भागीदारी केली.




हेल्सने इंग्लंडकडून ३० चेंडूत ७ चौकार आणि १ षटकार लगावला. श्रीलंका संघाकडून गोलंदाजी करताना लहिरु कुमारा, वानिंदू हसरंगा आणि धनंजया डी सिल्वा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. या तिघांनी अनुक्रमे २४, २३ आणि २४ धावा दिल्या.

तत्पूर्वी या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंका संघाने आक्रमक सुरुवात केली होती, परंतु चौथ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर श्रीलंकेला पहिला धक्का बसला. ख्रिस वोक्सने कुसल मेंडिसला (१८) लियाम लिव्हिंगस्टोनकडे झेलबाद केले. त्यामुळे श्रीलंकेने चार षटकांत एक गडी बाद ३९ धावा केल्या. त्यानंतर पाथुम निसांकाने संघाचा डाव सावरताना शानदार खेळी साकारली.



**पनवेल : शिरढोण येथे रायगड प्रीमियर लीग स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात शुक्रवारी रायगड जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट टीम २०२१-२२ पुरस्कार जीवदानी स्पोर्ट्स बामणडोंगरी या संघाला आमदार महेश बालदी यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी संघाचे अध्यक्ष राकेश गायकवाड, मंगेश वाकडीकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार मिळल्याबद्दल संघाची गावात वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. संघ उभारण्यासाठी ज्यांनी मेहनत घेतली अशा सर्वांचे आभार वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे यांनी मानले.**



# केएल पुढील स्पर्धेत आणखी चमकेल -गंभीर

**मुंबई : प्रतिनिधी**

बांगलादेशविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात भारताने विजय तर मिळवलाच पण त्याचबरोबर संघासाठी अजून एक सकारात्मक गोष्ट घडली, ती म्हणजे भारतीय संघाचा उपकर्णधार केएल राहुल फॉर्ममध्ये परतला आहे. भारतीय संघाचा माजी खेळाडू गौतम गंभीरने राहुलच्या फॉर्मवर महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. राहुलच्या या कामगिरीनंतर गौतम गंभीर म्हणाला आहे की, केएल पुढील स्पर्धेत आणखी चमकेल.

याआधी झालेल्या तीन सामन्यांमध्ये पूर्णपणे फ्लॉप ठरलेल्या केएल राहुलला सूर गवसला आहे. या भारतीय सलामीवीराने ३२ चेंडूत सर्वोत्तम फटकेबाजी करत अर्धशतक झळकावून संघ व्यवस्थापनाची डोकेदुखी दूर




केली, तसेच केएल राहुलच्या पाठीमागे असलेले सर्व टीकाकार आता त्याचे कौतुक करू लागले आहेत. केएल राहुलने उच्चस्तरीय शॉट्स खेळले. जेव्हा केएलने ब्रिस्बेनमध्ये खेळल्या गेलेल्या सराव सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध अर्धशतक झळकावले, तेव्हा प्रत्येक जण त्याच्याकडून खूप अपेक्षा करू लागला. यानंतर केएल चालला नाही. त्याला खूप टीकेला सामोरे जावे लागले आणि त्याच्यावर दबावही आला.

गौतम म्हणाला की, मी सांगू इच्छितो की, एक वाईट खेळी एखाद्याला वाईट खेळाडू बनवत नाही, तसेच एक चांगली खेळी एखाद्याला महान खेळाडू बनवत नाही. आपण संतुलित असणे आवश्यक आहे. आता राहुलने फॉर्म पकडला आहे, मला खात्री आहे की, तो येत्या सामन्यांमध्ये स्पर्धेत आणखी प्रकाश टाकेल.

गौतम म्हणाला की, केएल राहुल नेहमीच फॉर्मात असतो. होय, असे काही वेळा होते, जेव्हा तुम्हाला योगदान द्यायचे असते, तुम्हाला माहित आहे की, हा विश्वचषक आहे आणि संपूर्ण क्रिकेट जग तुमच्याकडे पाहत आहे आणि जर तुम्ही चांगली सुरुवात केली नाही, तर तुम्ही वाईट खेळाडू बनत नाही. गंभीरने सांगितले की, केएल राहुल आता फॉर्ममध्ये आला आहे. तो आपला फॉर्म चालू ठेवू शकतो. केएल अधिकाधिक आक्रमक होऊ शकतो. कारण राहुलला येथून जसे खेळायचे आहे, तसे खेळण्यापासून त्याला कोणीही रोखू शकत नाही. फक्त केएल राहुल स्वतःला रोखू शकतो.

# ऑस्ट्रेलियात विराट कोहलीचा वाढदिवस विशेष पद्धतीने साजरा

**डेन्मार्क : वृत्तसंस्था**



टीम इंडियाचा फलंदाज आणि माजी कर्णधार विराट कोहली शनिवारी (दि. ५) ३४ वर्षांचा झाला आहे. विराटला वाढदिवसानिमित्त अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

दिल्लीकडून देशांतर्गत क्रिकेट खेळून या खेळात आपली कारकीर्द घडवणार्‍या विराटने शुक्रवारी आपला ३४वा वाढदिवस साजरा केला. जगातील महान फलंदाजांमध्ये त्याची गणना होते. त्याने एकट्याने टीम इंडियाला अनेक सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला आहे. सध्या टी-२० वर्ल्डकपमध्ये विराटने आतापर्यंत शानदार फलंदाजी केली असून आतापर्यंत चारपैकी तीन सामन्यात त्याने अर्धशतके झळकावली आहेत.

# कॅलम मॅक्लिओड आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

स्कॉटलंडचा अष्टपैलू कॅलम मॅक्लिओडने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. कॅलम मॅक्लिओड शेवटचा सामना टी-२० विश्वचषक २०२२मध्ये खेळला होता. २१ ऑक्टोबर रोजी त्याने झिम्बाब्वेविरुद्ध शेवटचा सामना खेळला होता. ३३ वर्षीय कॅलम मॅक्लिओडने २००७मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते.



कॅलम मॅक्लिओडने झिम्बाब्वेविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात २५ धावा केल्या, ज्यामध्ये स्कॉटलंडचा पाच विकेट्सनी पराभव झाला आणि स्कॉटलंडचा संघ टी-२० विश्वचषक सुपर १२साठी पात्र ठरू शकला नाही. मॅक्लिओड हा स्कॉटलंडचा सर्वांत अनुभवी खेळाडू आहे. त्याने संघासाठी पाच विश्वचषक खेळले आहेत. कॅलम मॅक्लिओडने इंग्लंडविरुद्ध १४० धावा केल्या, ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम खेळी असल्याचे म्हटले जाते. २०१८मध्ये, कॅलम मॅक्लिओडच्या या खेळीमुळे स्कॉटलंडने इंग्लंडविरुद्धचा एकदिवसीय सामना सहा धावांनी जिंकला. त्याने २०१४मध्ये कॅनडाविरुद्ध १७५ धावा केल्या होत्या, ही त्याची एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोत्तम धावसंख्या आहे.

कॅलम मॅक्लिओडने स्कॉटलंडकडून ८८ एकदिवसीय आणि ६४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com